

मासिक वार्तापत्र • अंक 14 • जुलै 2020 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

लॉकडाऊन मध्ये कामगारांच्या हक्कांवर प्रहार मात्र चालूच 4

'पीएम केअर्स' फंड: आणखी एक महाघोटाळा 9

कोरोनाच्या काळातही न्यायव्यवस्था भांडवलदारांच्या सेवेत! 12

## कोरोना संकटाने पुन्हा सिद्ध केले आहे की भांडवली व्यवस्था नष्ट केल्याशिवाय कामगार वर्गाला न्याय मिळणे शक्य नाही!

संपादक मंडळ

चार महिन्यांच्या कोरोना संकटाने देशातील सरकार, सर्व भांडवली पक्ष, पोलिस यंत्रणा, न्याय व्यवस्था, अधिकारी वर्ग, मीडिया यांचे खरे भांडवली वर्ग चरित्र पुन्हा एकदा उघडे केले आहे. या चार महिन्यांच्या अनुभवाने दाखवून दिले आहे की भांडवली व्यवस्थेमध्ये या सर्वांचे काम हे फक्त भांडवलदार वर्गाच्या हितांचे रक्षण आहे आणि त्यासाठी नेहमीप्रमाणेच कामगार वर्गाच्या रक्तातून या संकटाची किंमत वसूल केली जाणार आहे. कामगारांचे स्थलांतर रोकण्यासाठी सर्व व्यवस्थेने केलेले प्रयत्न आणि आता कामगारांनी परत यावे यासाठी चाललेल्या विनवण्या यातून दिसून येते की कामगार वर्ग हाच खरा समाजाची चालक शक्ती आहे, मालक वर्ग नाही! गेल्या चार महिन्यांमध्ये कामगार वर्गाने ज्या भयंकर यातना सोसल्या आहेत, आणि केंद्रापासून ते राज्यापर्यंत विविध सरकारांनी जी भांडवलदार वर्गाची सेवा चालवली आहे, त्यांतून आता भांडवली व्यवस्थेच्या मर्यादा आणि तिचे पाशवी चरित्र साफ दिसून आले आहेत. या अभूतपूर्व संकटातून जात असताना कामगार वर्गाने या अनुभवातून योग्य राजकीय धडे शिकणे आणि योग्य निष्कर्षांच्या आधारावर भावी लढे उभे करणे आवश्यक आहे.

### कोरोना: श्रीमंतांनी आणलेला आजार, शिक्षा गरिबांना

कोरोनाचा उगम चीन मध्ये झाला. 1976 सालापासून चीनने भांडवली विकास निती स्विकारल्यामुळे देशी आणि विदेशी भांडवलदारांचे हित आणि गुंतवणूक जपण्यासाठी चीनी राज्यसत्ता धडपडत आहे. उद्योगपतींच्या गुंतवणुकीच्या वातावरणावर परिणाम होऊ नये यासाठी चीनने कोरोनाचा उगम आणि प्रसाराबद्दल जगाला काही काळ अंधारात ठेवले आणि जगभरामध्ये कोरोनाच्या प्रसाराला अटकाव होण्यात अडथळे निर्माण झाले. विविध देशांमधल्या विमान प्रवास करणाऱ्या उच्च-वर्गीय़ प्रवाशांनी हा रोग जगभरामध्ये पोहोचवला आणि आता जगातील एकही देश असा नाही की जिथे हा रोग पसरलेला नाही. आजवर 1 कोटींपेक्षा जास्त लोकांना याची लागण झाली आहे आणि 5 लाखांपेक्षा जास्त लोकांचे जीव गेले आहेत.

सुरुवातीला परदेशी प्रवाशांमध्ये असलेला हा रोग हळूहळू देशाच्या सर्व झोपडपट्ट्यांमध्ये पसरला आहे. अंतर ठेवा, हात स्वच्छ ठेवा, गर्दी टाळा हे उपाय रोज फोनवर, टीव्हीवर ओरडून सांगितले जात आहेत. पण जिथे दहा बाय दहाच्या खोल्यांमध्ये संपूर्ण कुटूंब राहते, त्या गरिब कष्टकरी वस्त्यांमध्ये कुठून ठेवणार अंतर? जिथे रोजच्या खाण्याचीच चिंता कायम घर करून आहे, तिथे कुठून आणणार स्वच्छतेला आणि सॅनिटायझरला पैसे? एक सार्वजनिक संडास जिथे शंभरच्या वर लोकांना एकत्र वापरावे लागते, तिथे कुठून टाळणार गर्दी आणि संसर्ग?

मध्यम, उच्च वर्गातल्या लोकांनी आपापल्या सोसायट्या, बंगल्यांची दारं बंद करून टाकली आहेत. 'वर्क फ्रॉम होम' चा पर्याय उपलब्ध असलेले उच्चभ्रू लोक आपापल्या घरांनी सुरक्षित आहेत. बाहेरून येणाऱ्या कष्टकरी-कामगार घरकामगार महिला-पुरुष, स्वच्छता कामगार यांना जणू वाळीत टाकले आहे. परिणामी आता मुखत्वे सर्व कष्टकरी-कामगार वर्ग आता या महामारीच्या संकटाच्या भोवऱ्यात सापडला आहे आणि झपाट्याने वाढलेल्या या रोगाचा सर्वाधिक शिकार ठरत आहे.

### कोरोनाचे पसरणे: मोदी सरकारच्या दिरंगाईचा आणि हलगर्जीपणाचाच परिणाम

कोरोनाची पहिली केस भारतात जानेवारी मध्ये सापडली. 13 मार्च

पान 8 वर

## कोरोनाच्या साथीमध्ये नफेखोरीला आले उधाण! आरोग्याच्या धंद्याच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याची जीवघेणी स्पर्धा!

✍ **पूजा**

गेल्या काही महिन्यांपासून जगभरातील जवळ जवळ सगळेच लहान मोठे, विकसित-अविकसित, विकसनशील, श्रीमंत-गरीब देश कोरोना (कोविड-19) च्या वैश्विक स्तरावरील साथीच्या आजाराने ग्रस्त आहेत. कोरोनासारख्या साथीच्या आजाराला रोखण्यासाठी आजची भांडवली व्यवस्था असमर्थ ठरली आहे कारण **व्यवस्थेचं उद्दिष्ट समाजाला आजारापासून मुक्त करणे नसून आजाराचं निमित्त साधून नफा कमविणे हेच आहे.** भांडवलशाहीच्या मानवद्रोही नफेखोरीच्या केंद्रस्थानी माणूस नसून मूठभर श्रीमंतांच्या तिजोऱ्या आहेत. यामुळेच रोग असोत वा भुकंप वा पूर, अशा आपदा सुद्धा भांडवली गिधाडांसाठी नफा कमावण्याची संधीच असतात. ज्याला जितके लुटता येईल त्याने तितके लुटावे हा मंत्र तर संकटांच्या काळात जास्तच आळवला जातो, आणि भांडवलदारांची सरकारं सुद्धा याला चालना देतात. कोरोनाचे संकटही याला अपवाद राहिलेले नाही. भारतामध्ये या नफेखोरीची शोधावी तितकी उदाहरणे कमी आहेत.

कोरोनाच्या चाचणीसाठी चीनचे 'रॅपिड अँटिबॉडी टेस्टिंग किट्स' एका भारतीय 'रिअल मेटॅबॉलिक्स' नावाच्या दलाल कंपनीकडून सरकारने विकत घेतलेत—असे किट्स जे इतर देशांनी अयोग्य म्हणून नाकारले होते. हे किट्स आय.सी.एम.आर.ने म्हणजेच भारतीय सरकारी कंपनीने रिअल मेटॅबॉलिक्स आणि आलोक फार्मासुटीकल्स कडून प्रत्येकी 600 रुपये प्रति किट दराप्रमाणे विकत घेतलीत, जेव्हा की ह्या खाजगी कंपन्यांनी किट्स 245 रुपये प्रति किट प्रमाणे खरेदी केलेत. थोडक्यात 145 टक्के नफा! इतकेच नाही तर या किट्स खराब दर्जाच्या आहेत हे सुद्धा नंतर उघडकीस आले.

सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला होता की कोरोनाची चाचणी मोफत केली जावी. परंतु भांडवलदारांची पालखी वाहणाऱ्या मोदी सरकारला खाजगी कंपन्यांच्या नफ्याची सुद्धा इतकी काळजी आहे की त्यांनी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा याचिका दाखल केली आणि रु. 4500 दराने खाजगी चाचणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायलयाचे 'मन वळवले'!

कोरोनाच्या भीतीचा वापर करून पीपीई किट्स, हँडवॉश, सॅनिटायझर्स, साबण, जंतुनाशके, मास्कस, ग्लोव्हस्, यांचे भाव गगनाला भिडवले गेले आहेत. 8-10 रुपयांचे मास्क आजही सर्रास 25 ते 50 रुपयांना विकले जात आहेत आणि सरकार त्यावर काहीही करत नाहीये. एन95 सारखे चांगल्या दर्जाचे मास्क तर 150 ते 300 रुपयांना विकले जात आहेत, असे मास्क ज्यांना गुजरात मध्ये सरकार 31 टक्के नफ्यावर रु 65 ला विकत आहे! सर्जिकल मास्क च्या नावाने दुय्यम दर्जाचे कापड वापरुन सर्रास निळ्या रंगाचे मास्क विकले जात आहेत. सॅनिटायझर च्या 50 मिली च्या बाटलीच्या किमती रु. 75 पर्यंत वाढल्या होत्या. जनतेमधून निषेध येणे चालू झाल्यावर सरकारने 50 मिलीच्या सॅनिटायझरची किंमत रु. 25 पर्यंत मर्यादित केली आहे, म्हणजेच रु. 25 ठेवायला परवानगी दिली आहे! जे सॅनिटायझर 7.5 रुपयांना विकूनही काही कंपन्यांना आजही नफा होत आहे, त्याला 25 रुपयात विकण्याची परवानगी दिली गेली आही. थोडक्यात सरकारी परवानगीने सॅनिटायझर मध्ये 'थोडी कमी' नफेखोरी करण्याला खुली परवानगी देण्यात आली आहे.

लोकांच्या जीवाच्या धंद्याच्या या पवित्र गंगेमध्ये हात धुवण्यात हॉस्पिटल मागे कशी राहतील! एव्हाना सुद्धा लोकांना हवालदिल करून सोडणाऱ्या खाजगी दवाखान्यांनी कोरोनाच्या काळात तर कहरच केला आहे. हॉस्पिटलांची बिलं लाखांच्या घरामध्ये पोहोचली आहेत. पुण्यातील

पान 10 वर

# कोरोनाच्या सुलतानी संकटाविरोधात प्रवासी मजूर वर्गाचा संघर्ष सुरू

पान 5 वरून

व्यवस्थेचा वापर करून आंदोलन चिरडून टाकले. पोलिसांच्या लाठीचार्ज मध्ये मोठ्या प्रमाणात अनेक प्रवासी मजूर जखमी झाले.

मध्य प्रदेशामध्ये सुद्धा प्रवासी मजूर परत येत असताना पोलिसांनी मोठ्या प्रमाणात लाठीचार्ज करून त्यांच्या परतीचा रस्ता बंद केला होता. प्रवासी मजुरांना सांगण्यात आले सीमा बंद केल्यामुळे तुम्हाला जाता येणार नाही. हे प्रवासी मजूर दिल्लीमधून चालत आलेले होते. कोणत्याही प्रकारची सुविधा जाण्यासाठी उपलब्ध नव्हती. कामगारांच्या हालापेष्टांचे उत्तर पोलिसांनी मात्र लाठीचार्ज करून दिले. दिवसातील बारा ते पंधरा तास पायी प्रवास करून आपल्या गावी परत असताना अडवल्या गेल्यामुळे संतप्त कामगारांनी संघर्ष केला. लाठीमारा विरोधात प्रवासी मजुरांनी पोलिसावर स्वरक्षणासाठी हल्ला करण्यास सुरुवात केली. पोलिसांच्या गाड्यावर दगडफेक करण्यात आली.

पंजाब राज्यामध्ये लुधियाना शहरातील ढंडारी भागातील प्रवासी मजुरांना कोणत्याही प्रकारची औषधाची सोयीसुविधा उपलब्ध करून दिली गेली नाही. अन्नधान्य न मिळाल्यामुळे उपाशी पोटी त्यांना जीवन जगावे लागत होते. कामाची मजुरी सुद्धा ठेकेदार आणि मालकांनी दिली नसल्याने कामगारांनी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येऊन सरकारच्या विरोधामध्ये घोषणा देण्यास सुरुवात केली. कामगारांनी घोषणा देऊन सरकार जी काही खोटी आश्वासने देत आहे त्याची व्यवहारिक अंमलबजावणी केली जावी, लवकरात लवकर कामगारांना मजुरी देण्यात यावी, अन्नधान्य आणि औषधाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे यासारख्या मागण्या करत आंदोलन केले आणि रस्ता बंद करून टाकला. आंदोलन दडपून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिसांनी लाठीचार्ज केला इतकेच नाही तर हवेत गोळीबार करून आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला गेला.

दिल्लीजवळ गुडगाव सेक्टर 54 याठिकाणी गोल्फ कोर्स रोडच्या बाजूला 150 एकर परिसर सनसिटी टाऊनशिप बांधकाम चालू आहे. करोना महामारी च्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी जाहीर झाल्यानंतर या परिसरात प्रवासी बांधकाम मजुरांची मोठ्याप्रमाणात नाकेबंदी करण्यात आली, कारण हा परिसर अतिशय संवेदनशील म्हणून प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला. पण मजूरांना कोणत्याही प्रकारची सोयीसुविधा उपलब्ध करून दिली गेली नाही. औषध किंवा वैद्यकीय सोयीसुविधा, अन्नधान्य, किंवा मोलमजुरी सुविधा उपलब्ध करून दिले नसल्यामुळे मजुरांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला. बांधकाम मजूरांवर तर उपासमारीची वेळ आली होती. बांधकाम मजूरांनी मोठ्या तीव्रतेने प्रशासनाच्या अन्यायाचा विरोध करत सार्वजनिकरीत्या विरोध प्रदर्शन केले. रस्ता बंद करून सरकार आणि प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. बांधकाम मजूरांना यांना गावाकडे जाण्यासाठी वाहतुकीची सोय उपलब्ध करून देण्यात यावी, अन्नधान्याची देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी या मागण्यांना घेऊन मजुरांनी रस्ता बंद करून चक्काजाम करून टाकला. तरीही प्रशासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नाही. येथील बिल्डर मजुरांनी गावी जाऊ नये यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्नशील होते. पण त्यांनी कोणत्याही प्रकारची मदत न करता मजुरांना उपाशीपोटी जीवन जगण्यासाठी भाग पाडले.

महाराष्ट्रामध्ये सुद्धा राज्याअंतर्गत प्रवासी मजूरांची परिस्थिती आलबेल आहे अशी नाही. एका बाजूला उपासमारीच्या मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. दुसऱ्या बाजूला रोजगार उपलब्ध नसल्यामुळे किंवा ठेकेदारांनी पैसे न दिल्यामुळे दारिद्य अवस्थेमधे जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे पर्यायाने गावाकडचा रस्ता पकडून काहीतरी गावाकडे जाऊन रोजगार करता येईल का या विचाराने ते गावाकडे निघाले आहेत. पण गावाकडे जाऊन मनरेगाअंतर्गत काहीतरी काम करता येईल हा त्यांचा भाबडा आशावाद आहे. वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे. महाराष्ट्रातील दोन उत्पादनाचे क्षेत्र उदाहरणादाखल पाहता येतील, एक ऊसतोड कामगारांचे आणि दुसरे वीटभट्टी कामगारांचे. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र सोबत कोकण आणि इतर भागांमध्ये मोठ्या प्रमाणात ऊसतोड कामगार हंगामी स्वरूपाच्या कामांसाठी विविध ठिकाणी प्रवास करून मोलमजुरीसाठी धडपड करतात. महाराष्ट्राच्या एकूण 146 साखर कारखान्यां मध्ये प्रवासी ऊसतोड कामगार हंगामी स्वरूपात काम करतात. महाराष्ट्रात एकूण प्रवासी ऊसतोड कामगार संख्या अंदाजे तीन लाख पन्नास हजार इतकी आहे. कोल्हापूर जिल्ह्यात 11, 500 इतके प्रवासी ऊसतोड कामगार आहेत तर पुणे जिल्ह्यामध्ये 36, 950 इतके ऊसतोड प्रवासी कामगार आहेत. टाळे बंदीच्या काळात ऊसतोड कामगारांना मोठ्याप्रमाणात ठेकेदारांनी पैसे न दिल्यामुळे उपासमारीला सामोरे जावे लागले आहे. इतकेच नाही तर ऊसाच्या फडावरील कोणत्याही प्रकारची अन्नधान्य सोयी-सुविधा शासकीय स्तरावर करण्यात आलेल्या नव्हत्या. ऊस कारखाना मालक यांनी नेहमीच ऊसतोड कामगारांना कंबरतोड मेहनत करवून घेऊन त्यांना जगण्या लायकच रोजगार उपलब्ध करुन दिले आहेत. कोल्हापूर मधील अवकाळी पावसामुळे जवळपास शंभर प्रवासी ऊसतोड कामगारांच्या झोपड्या उध्वस्त झालेल्या होत्या. हजार पेक्षा जास्त ऊसतोड कामगारांना त्यांच्या मुलाबाळांसह पावसामध्ये रातभर भिजून काढावे लागली. अशाच कामगारांपैकी एका गटाने भिगवण याठिकाणी निकृष्ट दर्जाचे अन्न दिले त्याविरोधात त्यांनी संघर्ष केल्याचे दिसून येते.

कामगारांचे संघर्ष अशाप्रकारे वाढताना दिसून येत आहेत. अपेक्षेप्रमाणेच भांडवली मीडिया या सर्व आंदोलनांकडे डोळेझाक करण्याचे काम करत आहे. टाळेबंदी उठल्यानंतर काही ठिकाणी थोडा रोजगार मिळणे चालू झाले असले, तरी एकंदर परिस्थिती चिंताजनकच आहे आणि रोजगार, मजुरीमध्ये वाढ, घरभाडे आणि वीजबील माफी अशा अनेक मागण्यांना घेऊन कामगारांचे संघर्ष तापताना दिसत आहेत. येत्या काळामध्ये कामगार संघर्षांमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होणार हे निश्चित.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर - 9156323976, 9657590491

• पुणे - 9422308125


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

**बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 9156323976, 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# कोरोना साथीत पुणे व मुंबईतील कामगारांची दुरावस्था

✍ सुरज

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यसरकारकडून 24 मार्च रोजी राज्यात लॉकडाऊन लागू करण्यात आला. शहर आणि उपनगरातील कामगारांनी गजबजलेले कामगार-नाके मागील तीन महिने शांत झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन सुरू असताना सगळेच व्यवहार ठप्प झाले. या परिस्थितीत हातावर पोट असलेल्या लाखो कामगारांची सर्वाधिक कोंडी झाली. भारतातील लाखोंच्या संख्येने मजूर एकाच ठिकाणी अडकून पडले होते. अनेक कामगारांची राहण्याची, जेवणाची सोय नव्हती, त्यामुळे कोरोना टाळेबंदी, भूकबळीने अनेक कामगार मरण पावले.

### पुण्यातील कामगारांची अवस्था

एक प्रातिनिधिक उदाहरण घेऊयात. दांडेकर पूल, आंबिलओढा परिसरामध्ये दाटीवाटीने दहा बाय दहाच्या घरात राहणारे एकूण 700 ते 750 कुटुंब आहेत. त्यातील काही छोटे मोठे व्यवसाय करणारे आहेत. यामध्ये फुलांचा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. अनेक पुरुष रोजंदारीवर काम करतात तर स्त्रियांमध्ये घरकाम करणाऱ्या महिलांचे मोठे प्रमाण आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव जसजसा वाढत चालला आहे तसतशी येथील कामगारांची परिस्थिती बिकट व हलाखीची झाली आहे. सर्वत्र भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारने राशन वाटप सुरु केले असे म्हटले असले तरी राशन वाटपात अनेक त्रुटी असल्याचे आढळून आले आहे. दांडेकर पूल परिसरातील अनेक ठिकाणी अद्याप सरकारी कसलीच मदत पोहोचलेली नाही. सरकारने मदतीची मोठ मोठी आश्वासने देऊनही अजूनही कुठेच त्यांची अंमलबजावणी होताना निदर्शनास आले नाही. जी काही तुटपुंजी मदत व राशन कामगारांना भेटत आहे ते एकदम निकृष्ट दर्जाचे भेटत आहे, तेही विकत भेटत आहे व सर्वांना नाही! ज्यांच्याकडे राशन कार्ड नाही त्यांना तर राशन भेटतच नाही. अनेकांकडे राशन कार्ड असूनही तांत्रिक त्रुटी असल्यामुळे (उदा. ज्या राशन कार्ड वर बारा अंकी नंबर नाही किंवा त्याला आधारकार्ड लिंक नाही) राशन देण्यासाठी नकार दिला जात आहे. अनेक ठिकाणी तर राशन मध्ये किडे असणे, सडलेले राशन देणे असे प्रकार घडताना दिसून आले आहेत.

धायरी, नांदेड सिटी, किरकटवाडी व खडकवासला या भागातील स्थलांतरित मजुरांच्या काही प्रतिक्रिया पाहूयात. मध्यप्रदेशात पायी चालत निघालेले मजूर म्हणताहेत *"पैसे संपले, खायला अन्न नाही. ज्या ठिकाणी आम्ही काम करीत होतो, तेथील ठेकेदाराने आमच्याकडे दुर्लक्ष केले. जेवण अन्नधान्य काहीही दिले नाही. आता पैसेही संपले आहेत. हाताला काम पण नाही. आम्हाला गावी गेल्याशिवाय पर्याय नाही."* अशाच प्रकारे खडकवासला परिसरातील मजुरीचे काम करणाऱ्या कामगारांची उपासमार होत आहे. वाघोली येथे मध्यप्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान, उत्तरप्रदेश येथील मजुरांना गावी परतण्यासाठी खूप मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. पिंपरीमधील एका बिहारी कामगाराने सांगितले की *"दुपारी खाण्यासाठी कशी तरी एक वेळेची खिचडी भेटते आणि त्यातलीच थोडी रात्री खाण्यासाठी ठेवायची. पत्नी आणि दोन छोटी छोटी मुलं गावाकडे आहेत. तीन महिने झालं त्यांना पैसे पाठवू शकलो नाही. माझे आई वडील पण वारले आहेत. इथे पुण्यामध्ये चांगली मजुरी मिळते म्हणून आलो होतो. आता हात रिकामे झाले आहेत. कसं जगायचं आम्ही ?"*

### मुंबईमधील कामगारांची अवस्था

लॉकडाऊन कालावधीत असंघटित क्षेत्रातल्या प्रवाशी मजुरांना भूकबळीला सामोरे जावे लागले आहे. वरळीमधील जिजामाता नगर, रमाबाई नगर येथील मजुरांची परिस्थिती बिकट झाली आहे. मानखुर्द येथील मजुरांना खाण्यासाठी काही मिळत नाही अशी स्थिती झालेली होती. अनेक ठिकाणी सरकारकडून अन्नाचा पुरवठाच केला गेला नाही. यापैकी हजारो प्रवासी कामगारांना घरी परत जाण्यासाठी ट्रेन किंवा इतर वाहनांनी सोय सरकारतर्फे देण्यात आली नाही. अशा दुरावस्थेत प्रवाशी मजुरांनी आपल्या घरचा रस्ता पकडला आणि अनेक कामगार वरळी ते भिवंडी रोडपर्यंत, एखाद्या वाहनाचा तपास करत पायी प्रवास करत जाताना दिसले. श्रीमंतांसाठी सरकारने विमानांची सोय केली आहे तर सर्वसामान्य कामगारांना पायी चालण्यास मजबूर केले आहे! सरकार काय करत आहे याची माहिती सुद्धा कामगारांपर्यंत योग्यरीत्या पोहोचत नाहीये. अनेक पोलीस चौकींबाहेर 700-800 मजूर उभे राहिले आणि घरी जाण्याची मागणी केली. अशा सर्वांना फक्त तोंडी आश्वासने देऊन वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या. अनेक मजुरांना मागील दोन महिन्यांचा पगार मिळाला नाही. त्यामुळे त्यांच्याकडे थोडेच पैसे शिल्लक आहेत. जनतेच्या दबावामुळे 'श्रमिक विशेष ट्रेन' उशिरा सोडण्यात आली परंतु सरकारने रोजगार बुडालेल्या कामगारांकडून तिकिटांचे पैसे मात्र वसूल केले! इतकेच नाही तर 'श्रमिक विशेष ट्रेन' मधील प्रवास करत असलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची जीवनावश्यक अन्नधान्य व पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली नाही, परिणामी हजारो कामगारांना उपाशीपोटी प्रवास करत आपापल्या राज्यात पोहोचावे लागले.

### सरकारची तुटपुंजी मदत

बांधकाम कामगारांची झालेली आर्थिक कोंडी लक्षात घेऊन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना दोन हजार रुपये एवढे आर्थिक सहाय्य थेट बांधकाम कामगाराच्या बँक खात्यात डीबीटी (DBT) पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. असे आश्वासन देण्यात आले. बांधकाम कामगारांना भेडसावत असलेल्या अडचणीमध्ये कामगारांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री दिलीप वळसे- पाटील व संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मंडळाकडील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना दोन हजार रुपये एवढे तुटपुंजे आर्थिक सहाय्य थेट बांधकाम कामगाराच्या बँक खात्यात डीबीटी (DBT) पद्धतीने जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण 2000 रुपये ही रक्कम इतकी अपुरी आहे किंबहुना कामगाराच्या जीवनाची थट्टा करणारी आहे! खरेतर भारतामध्ये मुंबई, नवी मुंबई सहीत सर्वत्र बांधकाम क्षेत्रामध्ये सर्व निर्मिती या मजुरांमुळेच शक्य आहे. लाखो कोटींची घरं याच बांधकाम कामगारांनी बांधली आहेत पण ठेकेदार बिल्डर यांनी या काळात कामगारांची मजुरी सुद्धा दिलेली नाही. त्यामुळे त्यांना अनेक यातनांना सामोरे जावे लागत आहे. दररोज पाच लाख कामगार मजूर अड्ड्यावर रोजगारासाठी येत असत. पण कोरोना महामारीच्या लॉकडाऊनमुळे तो तुटपुंजा रोजगार पण हिसकावून घेतला गेला आहे. त्यामुळे आता नाके सुने झाले आहेत.

हातातील काम गेल्याने जगावे की मरावे असा प्रश्न पडलेल्या कामगारांनी हाताला काम द्यावे अथवा सरकारने मदत तरी करावी, अशी मागणी कामगारांकडून केली जात आहे. तरीही प्रशासन याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. प्रशासनाकडून तीन महिने मोफत राशन व मोफत गॅस देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, पण ते अनेकांसाठी अजूनही हवेतच आहे.

पुणे-मुंबई मधील कामगार न्यायपूर्ण सरकारी मदतीची मागणी करत आहेत. लॉकडाऊन लागू करणाऱ्या सरकारचे कर्तव्य आहे की सर्व मजुरांना सर्व जीवनावश्यक मदत तातडीने पोहोचवली जावी.

# देशाच्या विविध भागांमध्ये क्रांतिकारी युवक, विद्यार्थी आणि कामगार संघटनांकडून कोरोनाच्या साथीत मदत कार्य

✍ प्रवीण एकडे

कोरोना साथीच्या भयंकर परिस्थितीमध्ये, सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून दिलेले असताना देशभरातील विविध क्रांतिकारी युवक संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार संघटना मदत कार्य करण्यासाठी पुढे सरसावल्या आहेत. सामान्य जनतेच्या आर्थिक भागिदारीतून, कामगार-कष्टकरी वर्गासोबत एकतेच्या भावनेने हे मदत कार्य स्वयंसेवी पद्धतीने चालू आहे.

नौजवान भारत सभेतर्फे देशाच्या विविध भागांमध्ये कामगार-कष्टकरी वर्गापर्यंत अन्नाची तसेच राशनची मदत पोहोचवण्याचे काम अविरतपणे चालू आहे. महाराष्ट्रातील पुणे येथे दांडेकर पूल सर्व्हे नंबर 130, 132, 133, 214 या भागात तसेच चाकण, इंदिरा नगर, कात्रज परिसरा मध्ये शेकडो गरजू कुटुंबांना राशन च्या किट्स दिल्या गेल्या आहेत. तसेच सर्व्हे नंबर 135, 133 मध्ये काही दिवस तर कात्रज भागात प्रवासी कामगारांमध्ये 2 आठवड्यांपेक्षा जास्त दिवस, जनतेच्या सामुहिक श्रमातून आणि आर्थिक सहभागातून सतत सामुदायिक किचन चालू आहे. नौभासतर्फेच मुंबई मध्ये गोवंडी मधील काही भागात एक महिन्यापेक्षा जास्त काळापासून दररोज तयार अन्न विविध व्यक्तींच्या सहाय्याने वाटण्यात येत आहे तसेच सामुदायिक किचन ही चालवले जात आहे. परिसरातील युवक मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी होत आहेत. दिल्ली मध्ये करावल नगर भागातही नौभास कडून मदतकार्य चालू आहे. बिहार मध्ये पाटण्यातील बिंद टोला तसेच मैनपुरा भागात लॉकडाऊन सुरू झाल्या पासून गरजु लोकांना राशन पुरवले जात आहे. नोएडा येथील सेक्टर ओमेगा-2 आणि कासना भागात नौजवान भारत सभेने काही कामगार कुटुंबांपर्यंत स्थानिक लोकांच्या जनसहयोगातून राशन, तसेच इतर जीवनावश्यक गोष्टी पोहचवण्याचे काम केले आहे. उत्तर प्रदेशमधील अलाहाबाद आणि गोरखपूर मध्ये दिशा विद्यार्थी संघटना आणि उत्तर-पश्चिम दिल्ली च्या शाहबाद डेरी परिसरामध्ये "दिल्ली घरेलू कामगार यूनियन" च्या वतीने सामुदायिक किचन 31 मार्च पासून नियमितपणे चालवले जात आहे. शाहबाद डेरी, रोहिणी सेक्टर 27 च्या परिसरात काही ठिकाणी तयार अन्न ही पोहचवले जात आहे. दिल्लीमध्येच "बवाना औद्योगिक क्षेत्र मजदूर यूनियन" द्वारा मेट्रो विहार मध्ये राशन पोहचवण्याचे काम नियमितपणे चालू आहे.



सामुदायिक किचन, गोवंडी, मुंबई

नौजवान भारत सभा मिळून मदतकार्य करत आहेत. हे सर्व मदतकार्य जन सहयोगातून आणि जनतेच्या सामूहिक कष्टातून, आरोग्य विषयक सर्व काळज्या घेत चालवले जात आहे.

देशभरात विविध कामगार संघटना सुद्धा मदतकार्य करण्यास पुढे सरसावल्या आहेत.

खरेतर नियोजनाच्या अभावी केलेल्या लॉकडाऊन मुळे कष्टकरी वर्गासमोर समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. लॉकडाऊन मुळे अनेकांचे रोजगार गेले आहेत तर अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अजूनही अनेक ठिकाणी राशन ची मदत सुद्धा पोहोचलेली नाही जी थोडी मिळाली आहे ती ही अत्यंत तुटपुंजी आहे. प्रवासी कामगारांची परिस्थिती तर अत्यंत वाईट झाली आहे. त्यांच्याकडे एक तर राशन कार्ड नसल्यामुळे त्यांना राशन ही मिळत नाही आहे आणि सरकारने त्यांना स्वगृही नेण्याची सोय केली नसल्याने घरीही जाता येत नाही. अश्यातच असंख्य प्रवासी कामगार स्वगृही परतण्यासाठी हजारो किलोमीटर ची पायपीट करत आहेत. खरे तर अश्या महामारीच्या काळात सरकारने कामगार कष्टकऱ्यांची जेवणाची, राहण्याची तसेच आरोग्याची सोय करने गरजेचे आहे परंतु नेहमी प्रमाणेच सरकारने यातून अंग काढून घेतले आहे व गरीब जनतेवर उपासमारीची वेळ आणली आहे.

अशावेळी एकतेच्या भावनेने विविध युवक, विद्यार्थी संघटना तसेच कामगार संगठना मदतकार्य करत असतानाच आपण हा ही प्रश्न उपस्थित केला पाहिजे की या साथीच्या काळात सुद्धा नवीन संसद भवन बांधण्यासाठी मोदी सरकारकडे 22, 000 कोटी रुपये आहेत परंतु जेव्हा प्रवासी कामगारांना स्वगृही पाठवण्याची वेळ येथे तेव्हा मात्र सरकारकडे पैसे का नसतात व तिकिटाचे पैसे सुद्धा कामगारांकडूनच का वसूल केले जातात?

# लॉकडाऊन मध्ये कामगारांच्या हक्कांवर प्रहार मात्र चालूच

✍ निमिष

कोरोनाच्या साथीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून 22 मार्च पासून संपूर्ण देशात संपूर्ण लॉकडाऊन घोषित करण्यात आले. त्यानंतर तीन वेळा हे लॉकडाऊन वाढवण्यात आले, आणि जवळपास तीन महिने चालले. लेख लिहीत असताना काही भागात आंशिक व काही भागात संपूर्ण लॉकडाऊन चालू ठेवण्यात आले, तर काही ठिकाणी चालू-बंद पद्धतीने लॉकडाऊन लावणे-काढणे चालू आहे. नेहमीप्रमाणेच, म्हणजे अत्यंत अविचारी व आकस्मिक पद्धतीने, लॉकडाऊन केल्याने सर्वच कामगारांसमोर अस्तित्वाचे संकट उभे राहिले. विशेषतः प्रवासी कामगारांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. सोबतच लॉकडाऊन बरोबरच जमावबंदी देखील केली गेली. ह्या दोन्हीमुळे कामगारवर्गाला व जनतेला एकत्र येऊन निदर्शने, आंदोलने, व कुठल्याही स्वरूपाचे विरोधप्रदर्शन करणे अशक्यप्राय होऊन बसले. ह्या संधीचा फायदा घेऊन मोदी-शहांचे फॅसिस्ट सरकारच नव्हे तर अनेक राज्य सरकारे सुद्धा सूचना, अध्यादेश इत्यादी सरकारी हत्यारे वापरून कामगारांच्या हक्कांवर प्रहार करत आहेत वा करण्याच्या तयारीत आहेत.

खरेतर कोरोनाची साथ येण्याअगोदरच नफ्याचा दर सगळ्याच क्षेत्रात खालावत असल्याने अर्थव्यवस्था वेगाने मंदीकडे वाटचाल करत होती. लॉकडाऊनमुळे सर्व उद्योगधंदे बंद ठेवावे लागल्याने नफ्याचा दर आणखीनच खालावला आहे, व त्यामुळे सर्व नफेखोर भांडवलदार वर्ग 'त्राही माम-त्राही माम' चा घोष करत आहे. नफ्याचा घसरता दर सावरण्याचे दोनच मार्ग आहेत. एक म्हणजे कामगारांच्या कामाचे तास वाढवणे, किंवा कामाचे अधिकाधिक मशिनीकरण करणे. मोठ्या उद्योगांमध्ये शक्य तितके मशिनीकरण अगोदरच झाले असल्यामुळे, एकच मार्ग उरतो, तो म्हणजे कामाचे तास वाढवणे. मोदी सरकार नेमके हेच करू पाहत आहे. फॅक्टरी कायद्यामध्ये दुरुस्ती करून कामाचे तास आठ ऐवजी बारा करण्याची तयारी केली जात आहे. गुजरात, पंजाब, व राजस्थानच्या राज्य सरकारांनी तर सूचना काढून कामाचे तास बारा करून टाकले सुद्धा आहेत. राजस्थान मध्ये काँग्रेसचे सरकार असले तरी कामाचे तास वाढवणारे पहिले राज्य राजस्थान होते. ह्यावरून काँग्रेसचे भांडवलदार धार्जिणे चारित्र्य दिसून येते. कामाचे तास वाढवताना वेतन सुद्धा त्याच प्रमाणात वाढवण्याची सूचना जरी केली गेली असली, तरी ह्यामुळे ओव्हरटाईमची कल्पनाच हद्दपार होणार आहे. फॅक्टरी कायद्यानुसार दिवसाचे 8 तास काम केल्यानंतर कामगार 4 तास ओव्हरटाइम करू शकतो, परंतु ओव्हरटाईमचे वेतन दुप्पट दराने दिले जाईल अशी तरतूद आहे. कामाचे तास बारा केल्यानंतर एकेरी दरातच 12 तास काम करवून घेता येते. शिवाय जर मोदी सरकारने कामाचे तास 12 केले तर दिवसाच्या तीन ऐवजी दोनच शिफ्ट होतील व त्यामुळे आपोआपच 33टक्के कामगारकपात करता येईल. अगोदरच नवे उच्चांक गाठत असलेली बेरोजगारी झपाट्याने वाढेल. ढासळती अर्थव्यवस्था सावरण्यासाठी कामाचे तास वाढावेत अशी मागणी मालकवर्गाकडून देखील केली जात आहेच. 'अर्थव्यवस्थेचा पूर्वपदावर आण्यासाठी प्रत्येकाने आठवड्यात 60 तास काम करायला हवे' असे इन्फोसिसचे मालक नारायण मूर्ती (जे कामगारप्रेमी आदर्श उद्योगपती आहेत अशी काही उदारमतवादी भाबड्यांची समजूत आहे) काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत म्हणाले. म्हणजेच ढासळत्या अर्थव्यस्थेचा सगळा बोजा कामगारांवर टाकण्याचा प्रयत्न मोदी सरकार करत आहे.

सर्व कामगारकायद्यांना 4 लेबर कोड्स (कायद्याचा मसुदा) मध्ये एकत्र करायचे काम मोदी सरकारने हाती घेतले आहे. ह्यापैकी एक, म्हणजे वेतनाबद्दलचा कोड संसदेत आधीच पारित झालेला होता. राहिलेले तीन आता संसद बंद असल्याचा फायदा घेऊन अध्यादेशाच्या मार्गाने आणण्याचा सरकारचा डाव आहे. वेतनाबद्दलच्या कोडमध्ये सगळ्यात महत्वाचे म्हणजे किमान वेतन दिवसाचे 178 रुपये, म्हणजेच महिन्याचे जवळपास 5000 रुपये इतके करणे. कोणत्याही ठिकाणी इतक्या वेतनात अन्न, पाणी, औषधे, शिक्षण, घरभाडे अशा मूलभूत गरजा भागवणे तर दूरच, खरेतर हे माणसाला हाल-हाल करून उपाशी मारण्याचे नियोजन आहे! मुख्य म्हणजे 2 वर्षांपूर्वी निर्धारित केलेल्या किमान वेतनात केवळ 2 रुपये वाढ करून हे नवीन वेतन ठरवले आहे. जर दोन वर्षातला महागाईचा दर लक्षात घेतला तर वास्तवात मागच्या पेक्षा किमान वेतन वाढवले नसून कमीच केले आहे. आजच्या परिस्थितीत किमान वेतन महिन्याला 20, 000 असलेच पाहिजे. दुसरे म्हणजे ह्या कोडनुसार मालकाने कामगारांचे वेतन दिले नाही, वा वेळेवर दिले नाही, तर कुठल्याही कामगाराला कोर्टात जाता येणार नाही. त्यासाठी कोर्टाच्या अखत्यारीत नसलेली अर्धन्यायी (quasi-judicial) समिती तयार केली जाईल व ह्यामध्ये केवळ कर्मचारी वा युनियनच तक्रार नोंदवू शकतील. म्हणजेच असंघटित कामगारांच्या वेतनाची चोरी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मालकांना दिलेले आहे.

दुसरा जो कोड आहे, इंडस्ट्रीअल रिलेशन्स कोड (Industrial Relations Code, औद्योगिक संबंधांचा कोड) त्यामध्ये कामगारांच्या युनियन बनवण्याच्या अधिकारावर आघात केलेला आहे. ह्या कोडनुसार कुठल्याही कारखान्यात एकापेक्षा जास्त युनियन असतील, तर ज्या युनियनला 75 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त कामगारांचे समर्थन असेल अशा युनियनलाच अधिकृत मानले जाईल. असे कुठलेही एक युनियन नसेल तर सरकारद्वारे मध्यस्थी करण्याकरिता समिती नेमली जाईल. सरकारच भांडवलदारवर्गाचे आहे, त्यामुळे अशा सरकारने नेमलेली हि समिती कुठल्या बाजूला झुकेल हे उघडच आहे. दुसरे म्हणजे ह्या कोडनुसार कंत्राटी कामगारांना कामावर ठेवणे, आणि काढून टाकणे मालकांसाठी आणखी सोपे केले आहे. ह्याअगोदरच अनेक क्षेत्रांमध्ये कंत्राटी कामगारांचे व कर्मचाऱ्यांचे प्रमाण वाढत होतेच, आता त्याला कायदेशीर मान्यता देखील मिळेल.

तिसरा कोड, म्हणजेच व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य कोड (Occupational Safety and Health Code, ऑक्युपेशन सेफ्टी अँड हेल्थ कोड) ह्याला खुद्द राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या युनियनचा, म्हणजे भारत मजदूर संघाचा सुद्धा, दिखाव्याचा का होईना, विरोध आहे. ह्या कोडमधून असंघटित क्षेत्राच्या कामगारांना, व दहापेक्षा कमी कामगार काम करत असलेल्या उद्योगांना वगळण्यात आले आहे. म्हणजेच देशातील ८० टक्केपेक्षा जास्त कामगारवर्ग ह्या कोडमधून वगळण्यात आलेला आहे. बांधकाम कामगारांच्या व्यावसयिक सुरक्षेबद्दल सुद्धा अत्यंत लेचेपेचे धोरण हा कोड अवलंबितो.

चौथा कोड कामगारांच्या सामाजिक सुरक्षेबद्दल आहे. ह्या कोडमधल्या अनेक तरतुदी नुसत्याच कामगारविरोधी नाही तर अमानवी आहेत. प्रसूतिविषयक लाभ अधिनियम (१९६१) खाली प्रसूतीनंतर मिळणारे लाभ २ पेक्षा जास्त मुले असणाऱ्या स्त्रियांकडून काढून घेण्यात आलेले आहेत. सामाजिक सुरक्षेमध्ये भागीदार असणाऱ्या मालक, कामगार, व सरकार ह्या तीन पक्षांपैकी कामगारांच्या पक्षाबाबत ह्या कोडमध्ये काहीही उल्लेख नाही. त्यामुळेच हा कोड अत्यंत एकाधिकारशाही पद्धतीचा आहे.

ह्यातील दुसरा, तिसरा, व चौथा कोड सरकार अध्यादेशाच्या मार्गाने अंमलात आणू पाहत आहे. लॉकडाऊन असल्यामुळे सरकारच्या अशा डावपेचांचा विरोध करता येण्याच्या शक्यता नगण्य उरल्या आहेत. ह्याच संधीचा फायदा घेऊन हे सरकार कामगारकायद्यांमध्ये आजवरचा सगळ्यात मोठा बदल करू पाहत आहे.

इतकेच नव्हे तर औद्योगिक संबंधांच्या कोडवर स्थायी समितीने आपल्या अहवालात अशी शिफारस केली आहे कि पूर, भूकंप इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या काळात जर कारखाने बंद ठेवावे लागले, तर कामगारांना त्या काळाचे वेतन देणे मालकांसाठी बंधनकारक करू नये! विशेष म्हणजे ह्या स्थायी समितीत सर्व मोठ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी होते - भाकप व माकप सारख्या ढोंगी कम्युनिस्ट पक्षांचे सुद्धा. ज्या एप्रिल महिन्यात हा अहवाल संसदेला पाठवला गेला त्याच एप्रिल महिन्यात कोरोनाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे वेतन न मिळाल्याने कामगारांचे व खास करून प्रवासी कामगारांचे किती हाल झाले हे तर सर्वांनी पहिलेच आहे. अशा परिस्थितीत मालकवर्गाला अशी सूट देणे निष्ठूर अमानवीपणाचे आहे. सदा सर्वकाळ कामगारांचे शोषण करून नफ्याने तिजोऱ्या भरायच्या व संकट आल्यावर त्याच कामगारांना वाऱ्यावर सोडून द्यायचे हेच भांडवलशाहीचे खरे चारित्र्य आहे, व तिला तसे करू देणाऱ्या सरकारचे व व्यवस्थेचे सुद्धा हेच खरे चारित्र्य आहे.

मोदी सरकार जसा ह्या संधीचा फायदा घेऊन कामगारांचे हक्क हिरवण्याचे काम शिताफीने करत आहे, तसेच ह्या संधीचा फायदा उद्योगपती भांडवलदार वर्ग सुद्धा घेऊ पाहत आहे. गुजरातच्या व्यापारी व औद्योगिक भांडवलदारांच्या एका परिषदेने सरकारच्या मंत्र्यांना पत्र लिहून काही मागण्या केल्या आहेत.

१७ एप्रिल रोजी कायदेमंत्री रवी शंकर प्रसाद ह्यांना लिहिलेल्या पत्रात अशी मागणी केली आहे कि कारखाना अधिनियम (Factories Act), औद्योगिक विवाद अधिनियम (Industrial Disputes Act), इत्यादी ह्यातील सर्व बंधनकारक तरतुदी एका वर्षासाठी हटवण्यात याव्यात. ह्यासाठी त्यांचे स्पष्टीकरण असे आहे कि पुढचे एक वर्ष सर्व व्यापार व उद्योग जगताचे लक्ष्य अर्थव्यवस्थेच्या पुनर्बांधणीमध्ये असणे गरजेचे आहे व ह्यांसारख्या कायद्यांमधील बंधनकारक तरतुदींमुळे त्यांना कोर्ट-कचेऱ्यांचे उंबरे झिजवायला लागू नयेत. अगोदरच मोदी सरकारने सत्तेत आल्यापासून ह्या आणि अशा कामगार कायद्यांना शिथिल आणि कमजोर करण्याचा सपाटाच लावलेला आहे (उदा ओव्हरटाईम १०० तासांवर नेणे, युनियन बनवण्याची प्रक्रिया अवघड करणे, इत्यादी). त्यात ह्या गुजरातच्या भांडवलदार संघटनेला उरल्यासुरल्या बंधनकारक तरतुदी देखील नको आहेत. म्हणजेच कामगारांचे अनिर्बंध शोषण करायला रान मोकळे! ह्याचा केवळ कामगारांनीच नव्हे तर सर्व कष्टकरी जनतेने कडाडून विरोध केलाच पाहिजे, कारण हे कायदे व ह्या तरतुदी सर्व उत्पादकांना व सर्व कष्टकऱ्यांना लागू होतात. त्या हटवल्या तर शोषण केवळ कामगारांचे होईल असे नाही तर सर्व कष्टकरी वर्गाचे होईल.

आता आपण त्यांच्या सर्वात गंभीर मागण्यांकडे येऊ. केंद्रीय कामगार मंत्री संतोष कुमार गंगवार ह्यांना १७ एप्रिल रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांनी युनियन अनिवार्य असण्याची अट एक वर्ष स्थगित करण्याची मागणी केली आहे! ह्या मागणीच्या स्पष्टीकरणार्थ ते म्हणतात कि काही युनियन कारखानदारांना नियम कायद्याची भीती दाखवून त्यांना ब्लॅकमेल करीत आहेत, व कामगारांना कामावर परत रुजू होण्यापासून रोखत आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या हितासाठी युनियनची आवश्यक अट एका वर्षासाठी हटवावी अशी मागणी करण्यात आलेली आहे. युनियन समाजविघातक तत्त्वे असतात असे त्यांनी ह्या पत्रात म्हटले आहे! ह्याचा कामगार कष्टकरी वर्गाने एकीने व निकराने विरोध करणे गरजेचे आहे. लॉकडाऊनच्या काळात जवळजवळ सर्वच भांडवलदारांचा नफा रसातळाला गेल्याने, लॉकडाऊन उठल्यानंतर ते नफा परत मिळवण्यासाठी कामगारांना पिळवटून काढून त्यांचे अभूतपूर्व शोषण करतील हे निश्चित. अशा परिस्थितीत मालकवर्गाच्या अमानुष दमनाविरुद्ध लढण्याकरिता युनियन हे कामगाराकडे असलेले अत्यंत प्रभावी शस्त्र आहे, आणि हे भांडवलदार तेच निकामी करू पाहत आहेत. जर ही मागणी मान्य झाली मालकवर्गावर कामगारांचा कुठलाही अंकुश राहणार नाही, व मालकाशी लढायला संघटित होता येणार नाही. त्यांनी मागणी जरी एक वर्षासाठीची केली असली तरी हे भांडवलदारांचे सेवक असलेले फॅसिस्ट सरकार त्या मागणीची संधी साधून युनियन कायमचे निकालात काढतील ह्याची शक्यता नाकारता येत नाही. फॅसिझमचा इतिहास असाच आहे.

कोरोनाची साथ आली असताना, उद्योगधंदे बंद असताना कामगारांच्या मूलभूत गरजा, सार्वजनिक आरोग्य ह्यांसारख्या कामगार व जनतेसाठी अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टींवर काम करण्याचे सोडून, लॉकडाऊनने दिलेल्या संधीचा फायदा घेऊन कामगारांच्या शोषणासाठी हे फॅसिस्ट सरकार कायदे-अध्यादेश-कोडच्या नावाखाली भांडवलदारवर्गाकरिता नवनव्या संधीच तयार करत आहे. सर्व कामगारवर्गाने एकत्र येऊन एकीच्या बळावर हा घृणास्पद संधिसाधूपणा हाणून पाडला पाहिजे.

## सवालाचा जबाब दे रं

✍ भास्कर जाधव

ही आग चहू बाजूनं हो लागली संसारा
सवालाचा जबाब दे रं देशाच्या सरकारा
दुधाच्या रंगाची आज बुजली वळख
परागंदा झालं हो, खोबरं खारीक
गुळाच्या चहावर बाळाचा गुजारा
सवालाचा जबाब दे रं ...
सोन्याची किंमत आली, गोडया रं तेलाला
खोबरेलचा थेंब, आम्हा मिळंना डोईला
घासलेटावाचून अंधार सोईरा
सवालाचा जबाब दे रं ...
उन्हात भाजतो, आम्ही पावसात भिजतो
थंडीचा कडाका, उघडयानं सोशितो
आम्हालाच अजून का मिळंना निवारा
सवालाचा जबाब दे रं ...
रात्रंदिस राबून, आम्ही झोपतो उपाशी
आईतखाऊ हा तिकडं, जेवतो तुपाशी
चोराला मलिदा, अन् धन्याला धतुरा
सवालाचा जबाब दे रं ...
मोठयाच्या गुराला, चराया गायरानं
जंगलाच्यासाठी आहे, राखली जमीन
माणसाला जगण्यासाठी नाही का आसरा
सवालाचा जबाब दे रं ...
स्वराज्याच्यासाठी, आम्ही भरिले तुरुंग
गोऱ्याच्या गादीला, आम्ही लाविला सुरुंग
हे पोळ पोसाया का आम्ही पुजीला देव्हारा
सवालाचा जबाब दे रं ...
मजूरीत वाढ आणि बेकारांना काम
कसण्यासाठी आम्ही, थोडी मागतो जमीन
तुरंग काठया गोऱ्यांचा का मिळतो इशारा
सवालाचा जबाब दे रं ...
आता आम्ही राहू, उभे पायावर
जाती धर्म भेद, आम्ही सोडू वाऱ्यावर
राबणाऱ्या गोताचा करीत पुकारा
सवालाचा जबाब दे रं ...
घेतो आज आण आम्ही, जिवानिशी लढू
भांडवलशाहीला, आम्ही मसणात गाडू
आमुच्या राज्याचा हो वाजवू नगारा
सवालाचा जबाब दे रं ...

# कोरोनाच्या सुलतानी संकटाविरोधात प्रवासी मजूर वर्गाचा संघर्ष सुरू

✍ परमेश्वर

भारतामध्ये करोना महामारीवर प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फॅसिस्ट राज्यसत्तेने लॉकडाऊन जाहीर केल्यानंतर भारतातील प्रवासी मजुरांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. चुकीच्या पद्धतीने लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे रोगापेक्षा इलाज भयंकर म्हणायची स्थिती व्हावी अशाप्रकारे भारतातील प्रवासी मजुरांना अनेक संकटांना मोठ्या तीव्रतेने सामोरे जावे लागले आहे. पण लॉकडाऊनमध्ये सरकारी दडपशाहीला न जुमानता सरकारी अनास्था आणि दमनाच्या विरोधात प्रवासी मजुरांचे स्वयंस्फूर्त संघर्ष सुद्धा मोठ्या प्रमाणात भारताच्या विविध राज्यांमध्ये निर्माण झाले आहेत.

### प्रवासी मजुरांची स्थिती

प्रवासी मजूर, वा स्थानांतरीत मजूर (इंग्रजीत मायग्रंट वर्कर) म्हणजे आपल्या श्रमशक्तीच्या विक्रीसाठी आपल्या मूळ स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत प्रवास करणारे मजूर. प्रवासी मजुराचा स्थानांतरामागे मुख्य उद्देश रोजगार असतो. इकॉनोमिक सर्वे ऑफ इंडिया 2017 नुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 13 कोटी कामगार, म्हणजेच एकूण कामगारांचा जवळपास तिसरा हिस्सा, हे प्रवासी कामगार आहेत. त्यापैकी 9 कोटी हे दुसऱ्या राज्यात गेलेले प्रवासी मजूर आहे. एकूण प्रवासी मजूरांपैकी सर्वाधिक प्रमाणात बांधकाम क्षेत्र यामध्ये 4 कोटी, घरगुती कामाच्या क्षेत्रामध्ये 2 कोटी, टेक्स्टाईल क्षेत्रामध्ये 1.1 कोटी आणि वीटभट्टी क्षेत्रांमध्ये 1 कोटी कामगार असल्याचा अंदाज आहे. प्रवासी मजुरांचे कामाचे स्वरूप हे मुख्यत्वे असंघटित क्षेत्रातील आहे. त्यामुळे रोजगाराची आणि सामाजिक सुरक्षिततेची कोणत्याही स्वरूपाच्या संरक्षणापासून वंचित असलेला हा मजूर वर्ग आहे. 2001 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या 29.9 टक्के लोकसंख्या ही प्रवासी मजुरांची आहे. एकूण प्रवासी मजुरांपैकी 84.2 टक्के हे स्वत:च्याच राज्याअंतर्गत निर्वासित आहेत, तर 70.3 टक्के स्वत:च्याच जिल्ह्यामध्ये निर्वासित आहेत. राज्यांबाहेरील प्रवासी मजुरांमध्ये सर्वाधिक प्रमाणात मजुर हे उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यातून आल्याचे दिसून येते. त्यानंतर मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान, उत्तराखंड, छत्तीसगड, जम्मू काश्मीर आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधून ते असल्याचे दिसून आले. प्रामुख्याने भारतातील दिल्ली, महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये राज्याबाहेर प्रवासी मजूर आहेत.

टाळेबंदी च्या काळातील परिस्थिती प्रवासी मजुरांच्या मुळावर उठली आहे. त्याचे कारण नेमके काय आहे हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. भांडवली उत्पादन व्यवस्था ही नेहमीच नफा केंद्री राहिली आहे. कामगारांकडून कंबर तोड मेहनत करवून कमी पगारावर जास्तीत जास्त काम करून घेणे हेच तिचे उद्दिष्ट आहे. संकटाच्या काळात म्हणजेच नैसर्गिक आपत्ती, कोरोना सारखी महामारी किंवा आर्थिक संकट या परिस्थितीमध्ये तर शोषणाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. नफेखोरीसाठी मजुरी बुडवण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर याच काळात झाल्याचे दिसून येते. द हिंदु या इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या लॉकडाऊन काळातील 27 एप्रिल 2020 रोजी प्रसिद्ध झालेल्या एका सर्व्हेसाठी मार्च 27 ते एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत कालावधीमध्ये प्रवासी मजुरांचे भारतभरातील विविध राज्यात11, 159 सॅम्पल घेण्यात आलेल्या आहेत. या सर्वेनुसार म्हणजे 27 मार्च 2020 ते एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत जवळपास 96 टक्के प्रवासी मजुरांना कोणत्याही प्रकारची राशन आणि अन्नधान्याची सुविधा उपलब्ध झाली नव्हती. 90 टक्के प्रवासी मजुरांना मालकाकडून किंवा ठेकेदाराकडून त्यांच्या मजुरी देण्यात आलेली नव्हती. या सर्वातून आणखीन एक विदारक सत्य समोर आले की, टाळेबंदी च्या कालावधीमध्ये प्रवासी मजूरांकडे सरासरी दोनशे रुपये पेक्षा कमी पैसे उपलब्ध होते.

ग्रामीण भागातील मजुरांच्या रोजगाराची स्थिती अजून विदारक आहे. ग्रामीण भागामध्ये शेतीच्या भांडवली विकासाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या गरीब शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना गावामध्येच किंवा शहरांमध्ये जाऊन आपली श्रमशक्ती विकण्या पलीकडे दुसरा पर्याय उपलब्ध नाही. लॉकडाऊन झाल्यामुळे गावात जाऊन कोणतातरी रोजगार करावा आणि आपली उपजीविका भागवावी या पुरता मर्यादित विचार शहरातील प्रवासी मजुरांच्या डोक्यात आहे. पण मागच्या सात वर्षांमध्ये मनरेगा योजनेला पंगू करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. ग्रामीण भागात शंभर दिवस रोजगाराची हमी देणाऱ्या या योजनेच्या आर्थिक तरतुदींमध्ये प्रभावी वाढ झालेलीच नाही, तर दुसऱ्या बाजूला मागच्या सात वर्षापासून मनरेगा कायद्यातील मजुरीचा दर वाढवला गेला नाही. मार्च महिन्यामध्ये देशाच्या अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी मनरेगा कायद्याअंतर्गत मजुरीमध्ये वीस रुपये वाढ केल्याची घोषणा तरी केली असली तरी वस्तुस्थिती वेगळीच आहे. कबिर अग्रवाल यांच्या एका लेखाप्रमाणे पाच कोटी लोकांना यामुळे फायदा होईल असा दावा निर्मला सीतारामन यांनी केलेला असला, तरी वास्तवामध्ये त्यापैकी फक्त 6.8 टक्के लोकांनाच एप्रिल पर्यंत फायदा पोहोचलेला होता. एप्रिल पर्यंत तर गेल्या सात वर्षातील ही सर्वात मोठी रोजगार घसरण मनरेगा




कार्टून साभार : राजेंद्र धोडपकर

योजनेअंतर्गत पहायला मिळाली आहे. त्यानंतर काही प्रमाणात मनरेगा ला चालना देण्याचा प्रयत्न विविध सरकारांनी चालू केला असला, तरी तो अत्यंत अपुरा आहे.

थोडक्यात देशाच्या लोकसंख्येच्या जवळपास 10 टक्के असलेल्या प्रवासी मजुरांची स्थिती कोरोना काळात विदारक झाली आहे, आणि यामुळेच त्यांचे संघर्ष उफाळून येताना दिसत आहेत.

### प्रवासी मजुरांचे संघर्ष

लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात प्रवासी मजुराचा मोठा उद्रेक महाराष्ट्रातील कुर्ला-बांद्रा रेल्वे स्टेशनच्या समोर 15 एप्रिलच्या आसपास दिसून आला. भांडवली प्रसारमाध्यमांनी प्रवासी मजुरांना त्यांच्या गावाकडे जायचे आहे हे अर्धसत्य सांगून खरे कारण लपवण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला. खरे कारण हे होते की मुंबईमधील हे प्रवासी मजुर अन्नधान्यावाचून बेहाल झालेले होते. हजारो प्रवासी मजुरांना हाताला काम उपलब्ध होत नव्हते; अनेक प्रवासी मजुरांना मार्च महिन्या पासूनची मजुरी मालकाकडून किंवा ठेकेदाराकडून मिळालेली नव्हती. आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवासी मजूर भाड्याच्या एकच खोलीत आठ तासाच्या शिफ्ट मध्ये राहतात! त्यामुळे राहण्याचा सुद्धा मोठा पेचप्रसंग त्यांच्यासमोर निर्माण झाला होता. मजूरी असो वा अन्नधान्य वा राहण्याची सोय, यापैकी कोणतीही सुविधा केंद्र शासनाकडून आणि राज्य शासनाकडून करण्यात आलेली नव्हती. या पार्श्वभूमीवर मजुरांचा पहिला उद्रेक पाहण्यास भेटतो. संतप्त मजुरांनी रेल्वे मिळत नसल्यामुळे घोषणा दिल्या आणि त्यांना पांगवायला पोलिसांनी लाठीमार केला. प्रवासी मजुरांच्या या स्वयंस्फूर्त जमावाला मात्र जमातवादी रुप देण्याचा प्रयत्न भांडवली मीडियाकडून केला गेला आणि जवळ असलेल्या मशिदीजवळ हे (जणूकाही मुस्लिम) मजूर जमा झालेले आहेत अशा खोट्या बातम्या पसरवल्या गेल्या.

गुजरात राज्यामध्ये सुरत आणि डायमंड नगर याठिकाणी 10-12 एप्रिल दरम्यान आणि त्यानंतरच्या काळात मोठा संघर्ष झाल्याचे झाल्याचे दिसते. सुरतमधील सर्व प्रवासी मजूर पावरलूम आणि टेक्सटाईल क्षेत्रांमध्ये काम करणारे होते. उपलब्ध असलेल्या माहितीनुसार प्रवासी मजुरांना दोन दोन दिवस अन्नधान्य व कोणत्याही भोजना विना उपाशी झोपावे लागत असे. बारा तास काम करून सुद्धा ठेकेदार किंवा मालकांकडून त्यांची मोलमजुरी देण्यात आलेली नव्हती. त्यांना त्यांच्या गावाकडे जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली नव्हती. प्रवासी मजुरांना त्यांच्या गावी परत जाण्यासाठी त्यांच्याकडे पैसेसुद्धा नव्हते. ठेकेदारांनी मागच्या सहा आठवड्यापासून त्यांना कोणत्याही प्रकारची मोलमजुरी दिली नव्हती. त्यामुळे त्यांना गावी जायचे असेल तर काही सावकाराकडून कर्ज घेऊन ते आपल्या गावी परत जावे लागत होते. सुरत मधील प्रवासी मजुरांनी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येऊन या धोरणाविरोधात रस्ते बंद करून व सरकारच्या विरोधात घोषणा देऊन संघर्षाला सुरुवात केली. गुजरात मधील फॅसिस्ट सरकारने हे आंदोलन अत्यंत वाईट पद्धतीने चिरडून टाकले. अनेक प्रवासी मजुरांवर पोलिसांकडून लाठीचार्ज केला गेला आणि अश्रूधुराच्या कांड्यांचा वर्षाव करण्यात आला. लाठीचार्ज मध्ये अनेक प्रवासी मजूर जखमी झाले. लाठीचार्ज करण्यात आलेल्या प्रवासी मजुरांना कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली गेली नाही. पोलिसाच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधामध्ये आणि आपल्या रास्त मागणीसाठी डायमंड नगर मधील प्रवासी मजुरांनी मोठ्या प्रमाणात संघर्षाला सुरुवात केली आणि रस्ते बंद करून सरकार विरोधात आंदोलन करून रस्ता बंद करून टाकला होता. प्रवासी मजुराचे हे आंदोलन सुद्धा पोलिसांकडून चिरडून टाकण्यात आले. गुजरात मधील दाहीर या भागात प्रवासी मजुरांनी मोठ्या प्रमाणात टाळेबंदीच्या काळातील होत असलेले अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष केला. पोलिसांनी या आंदोलनाला चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला गेला पण त्याविरोधात सुद्धा प्रवासी कामगारांनी मोठ्या प्रमाणात संघर्ष केला. पोलिसांनी हिंसात्मक कारवाईचा मार्ग वापरल्यानंतर प्रवासी मजुरांनी त्याला प्रत्युत्तर दगडफेक करून दिले.

तेलंगणातील एल अँड टी या कंपनीत 28-29 एप्रिल दरम्यान सोळाशे प्रवासी कामगार कामावर काढून टाकल्यानंतर सुरू झाल्याचे दिसते. कामगारांच्या मजुरीत सुद्धा मोठ्या प्रमाणात कपात केल्यामुळे कामगाराने कंपनीच्या मालकाच्या विरोधात संघर्ष सुरू केला. मजुरी कपात न करता मजुरी द्या, कामावर परत घ्या या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलनाला कामगारांनी सुरुवात केली. कंपनीच्या मालकांनी कामगारांना कोणतेही ठोस आश्वासन न देता उलट रुपये मोदीच्या घोटाळेबाज 'पीएम केयर' फंडाला दिले आहेत. कामगारांना मरण्यासाठी सोडणाऱ्या पण मोदीच्या काळाबाजाराला दिडशे कोटी देणाऱ्या मालकांसाठी त्यांचा कारखाना चालवणारे कामगार मशिन आणि पशूंपेक्षाही हीन आहेत हे दिसून येते!

हरियाणातील सोनपुरी या भागातील कुंडली औद्योगिक क्षेत्रामध्ये झाला, जिथे प्रवासी कामगारांनी चक्काजाम केले. प्रवासी कामगारांना मोठ्या प्रमाणात उपासमार सामोरे जावे लागत होते. भोजनासाठी अनेक तास वाट पाहावी लागते असे. कोणत्याही प्रकारची धान्याची सुविधा कामगारांसाठी उपलब्ध नव्हते. इतकेच नाही तर कामाचे वेतन मालकाकडून मिळालेले नव्हते. अशा परिस्थितीत कामगारांनी स्वयंस्फूर्तपणे रस्ता चक्काजाम करून सरकारच्या विरोधात घोषणा दिल्या. पोलिसांकडून हे आंदोलन चिरडून टाकण्यात आले. पोलिसांनी मोठ्या प्रमाणात लाठीचार्ज केला गेला. पण त्याला न जुमानता पोलिसांच्या विरोधामध्ये दुसऱ्यांदा कामगारांनी आंदोलन करून आपल्या संघर्ष तीव्र करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील अजून एक महत्त्वाची घटना म्हणजे महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये जवळपास एक हजारपेक्षा जास्त कामगारांनी रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याची भूमिका घेतली. सरकारने कामगाराला अन्नधान्याचे सुविधा उपलब्ध करून देण्यात यावे, गावाकडे जाण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी यासारख्या मागण्या घेऊन मोठ्या प्रमाणावर कामगारांनी संघर्ष केला. प्रवासी कामगारांनी रस्त्यावर चक्काजाम केल्यामुळे पोलिसांनी हे आंदोलन थांबवण्यासाठी बळाचा वापर करून आंदोलन मागे घेण्यास भाग पाडले.

हैदराबाद मध्ये बेदमपल्ला जिल्ह्यातील रामागुंडम मधील एन.टी.पी.सी. लिमिटेड कंपनीतील हजारो कामगारांनी 4 मे च्या आसपास सरकारच्या विरोधामध्ये मोठ्या प्रमाणात घोषणा देऊन त्यांच्यावरती होत असलेल्या अन्याय आणि अत्याचार याचे विरोधामध्ये संघर्ष केला. सरकारने त्यांना परत गावी जाण्यासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, या मागणीला घेऊन ते आंदोलन करत होते. या आंदोलनाला दडपण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणात पोलिस

पान 2 वर

# कोरोनाच्या साथीत मानवाधिकारांचे हनन, पोलिसी अत्याचार

✍ रवी

कोरोना लॉकडाऊन मध्ये गरजेच्या वस्तू पुरवणाऱ्यांमध्ये पाटण्याचा सोनू शहा हा एक व्यक्ती होता. 26 मार्च रोजी व्हॅनमधून बटाटे विकताना त्याच्या पायावर पोलिसांनी गोळी झाडली. कारण नेहमीचेच. त्याने 5000 रुपयांची लाच देण्यास नकार दिला होता. कोरोना साथीच्या काळात पोलीस दमनाची ही काही एकच घटना नाही. देशाच्या अनेक भागांमध्ये अशा घटना समोर आल्या आहेत. मास्लोव्हची एक म्हण इंग्रजीत प्रसिद्ध आहे - "हातोडा असलेल्या माणसाला प्रत्येक समस्या खिळ्यासारखी दिसते". त्याचप्रमाणे कोरोना लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांनी हिंसेला जवळ केले आहे. अनेकांना वाटते की पोलिसांमुळेच कोरोनाच्या काळामध्ये शिस्त टिकली आहे आणि त्यांच्या कामाबद्दल अनेक जण कौतुकही करत आहेत, ज्याबद्दल आम्ही या लेखात पुढे मांडणी करू. मुख्य धारेतील मीडियाने जरी पाठ फिरविली असली तरीही या लज्जास्पद वाटणाऱ्या दमनाच्या घटनांचा ऑनलाईन मीडिया आणि सोशल मीडियावर पूर आला आहे आणि तो वाढतोच आहे. त्यातील काही घटना पुढीलप्रमाणे.

मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथून कारखाने बंद झाल्यामुळे अनेक कामगार शेकडो मैल दूर असलेल्या आपल्या गावी पायीच निघाले. उत्तरप्रदेशकडे निघालेल्या या कामगारांची पोलिसांकडून होणारी छळवणूक दाखवणारे अनेक व्हिडीओ प्रसारित झाले. अनेकांना तर काहीही न विचारताच दांडक्यांचे फटके पडले. यातून डॉक्टर आणि परिचारिका (नर्सेस) सुद्धा स्वतःला वाचवू शकले नाही. एवढेच नाही, लॉकडाऊनचा भंग करणाऱ्यांना सार्वजनिकरित्या उठाबश्या काढायला लावणे, जमिनीवर रांगायला लावणे किंवा लोळायला लावणे या सारखे प्रकार पोलिसांनी केले. खम्मम, तेलंगणा येथे तर पोलीस सहाय्यक आयुक्ताने एका पदव्यूत्तर शिक्षण घेणाऱ्या रात्रपाळीवर असलेल्या महिला डॉक्टरच्या थोबाडीत लगावली आणि शिवीगाळ केला. नागरिकांवर लाठीमार करतानाचे व्हिडीओ पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः सोशल मीडियावर टाकल्याची उदाहरणे सुद्धा अनेक आहेत. हातात गुलाबाचे फूल आणि "मी समाजाला धोक्यात आणत आहे" असे लिहिलेली पाटी देऊन फोटो काढणे यासारख्या अनेक तथाकथित 'नावीन्यपूर्ण' पद्धतींनी शिक्षा देऊन पोलिसांनी "रस्त्यावरच न्याय" ही भूमिका घेतलेली आहे.

पोलिसांच्या पाशवी कृत्यांच्या घटना बहुतांश राज्यांमध्ये आढळून आल्या आहेत. कोरोना विषाणुच्या वाढत्या प्रकरणांमुळे करोडो गरिबांमध्ये एकीकडे अन्न आणि पाणी मिळण्याची चिंता सतावीत असतानाच दुसरीकडे राज्यसत्तेच्या मनमानी हिंसेची भीती निर्माण झाली आहे. याचा फटका कामगार, कष्टकऱ्यांना अन्न पोहोचवण्याचे मदतकार्य करणाऱ्यांनासुद्धा बसला आहे. अत्यावश्यक सेवा पुरविणारे डिलिव्हरी बॉय आणि भाजी विक्रेत्यांवरसुद्धा पोलिसांनी हिंसाचार केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. फक्त व्यक्तीच नाही तर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असणारी वाहने, गाड्या यांचे सुद्धा नुकसान केले आहे. या अभूतपूर्व बिकट काळात अन्न-धान्य पिकवणारा शेतकरीसुद्धा यातून सुटू शकला नाही. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याच्या गाड्या अडवून पोलिसांनी त्यांची छळवणूक केली आहे. देशाच्या कोणत्याही भागात जावे तर शहरांमधल्या झोपडपट्ट्यांमध्ये घुसून घराबाहेर किंवा रस्त्यावर फक्त उभे असलेल्या लोकांना कोणतीही पुर्वसुचना वा इशारा न देता, सरळ दांडक्याचे फटके देण्याचे बेकायदेशीर काम सर्व राज्यांच्या पोलिसांनी केले आहे.

प्रश्न आहे की पोलिसांना असा कोणालाही मारण्याचा अधिकार आहे का? बिनाचौकशी, बिनाखटला, बिनाआरोप, कोर्टाच्या आदेशा शिवाय कोणत्याही व्यक्तीला अशाप्रकारे शिक्षा देण्याचा अधिकार शस्त्रधारी दलाला असेल तर ती लोकशाही व्यवस्था आहे असे म्हणता येईल का? जनतेच्या थोड्या घटकांच्या बेजबाबदार पणाची शिक्षा, जनतेच्या मोठ्या हिश्श्याला जो हतबल आहे, त्याला देणे हे कायद्यामध्ये कसे बसू शकते? **कोरोना हा आजार आहे की गुन्हा ज्याची अशाप्रकारे लोकांना शिक्षा दिली जात आहे?**

भारतासारख्या एवढ्या मोठ्या देशात, जेथे सरकारी शिक्षण, आरोग्यव्यवस्था आणि अन्नपुरवठ्याचा अभाव आणि गरीब आणि श्रीमंतांमध्ये मोठी तफावत आहे, तेथे शिक्षणाने, वैज्ञानिक प्रचाराने लोकांची मने वळवण्याचे सोडून राज्यसत्ता बळाच्या मार्गांचा अवलंब करत आहे. पण असे करण्यामागे एक महत्वाचे कारण आहे, आणि ते आहे सरकारची अकार्यक्षमता, जिला लपवण्यासाठी सर्व दोष जनतेच्या माथी मारला जात आहे आणि 'जागच्या जागी' शिक्षा सुध्दा सुनावली जात आहे. जेथे स्वतः प्रधानमंत्री पत्रकार परिषदेमध्ये तीन आठवड्यांच्या लॉकडाऊनच्या काळात नागरिकांना गरजेच्या वस्तू कशा मिळतील हे सांगू शकत नाही, तिथे सर्व जनतेला या लॉकडाऊनचा हेतू समजवण्यास वेळ तर लागेलच. तडकाफडकी लॉकडाऊन जाहीर करत असताना, लोकांना जीवनाच्या गरजा भागवण्याची तयारी करायलाही वेळ दिला नाही तर जनतेने घरामध्ये बसून उपाशी मरणाची वाट पाहणे अपेक्षित आहे का? कोणत्याही स्थितीत राज्यसत्ता करत असलेला अत्याचार अस्वीकार्य आहे. सरकार कोणावरही मनमानी हिंसाचार करू शकत नाही. इतर देशांसोबत तुलना केल्यास भारतामधील पोलिसांच्या अत्याचाराच्या घटना संख्येने खूप अधिक आहेत. गृहमंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार लॉकडाऊनचे उल्लंघन करणाऱ्यास कमीत कमी एक महिन्याचा कारावास किंवा दोनशे रुपये दंड किंवा दोन्हीही आणि जास्तीत जास्त सहा महिन्याचा कारावास किंवा एक हजार रुपये दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते. परंतु खटले चालवणे दूरच, जागच्या जागी शिक्षा करण्याचे पोलिसांचे धोरण पाहून असे वाटते जणू काही हे सरकारने पाळलेले पिसाळलेले कुत्रेच आहेत आणि धोका विषाणूपासून नाही तर यांच्यापासूनच आहे. महाराष्ट्रात तर खुद्द गृहमंत्र्यांनीच थेट टीव्हीवर पोलिसाला बोलावून दांडक्याला तेल लावून ठेवा असे जाहीरपणे सांगितले, तेव्हा या दमनयंत्रणेचे काम सरळ सरकारच्या आदेशाने चालू आहे हे दिसून येते.

या सर्वांवरून हेच दिसते की सरकारने कोणतीही पूर्व तयारी न करता हा लॉकडाऊन घोषित केला आहे. जनतेचे शिक्षण आणि अन्न व आरोग्य सुविधांचा पुरवठा यांचे कोणतेच नियोजन नसताना हा निर्णय घेण्यात आला. काही वांड लोकांना सोडले तर, शासन नागरिकांच्या मूलभूत गरजा पुरवू शकत नसल्याच्या मुख्य कारणामुळेच लॉकडाऊनचा भंग होण्याच्या अनेक घटना होत आहेत. आणि या उदाहरणांना दाबण्यासाठी पोलीस अत्याचाराचा पर्याय निवडत आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात या घटना घडत असताना सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे! शेवटी राज्यसत्ताच पोलिसव्यवस्थेला नियंत्रित करते, त्यामुळे या घटनांना सरकारच जबाबदार आहे.

याच काळात पोलिसांच्या या पाशवी वृत्तीला समर्थन करणारे लोक सुद्धा सोशल मीडियावर दिसून आले. काही लोक तर या कृत्यांना देशभक्ती म्हणत आहेत. आपण नक्कीच असे म्हणू शकतो की या लोकांची लोकशाहीची कल्पनाच खूप अविकसित आणि कुमकुवत आहे. त्यांना हे दिसत नाही की हे उघड उघड मानव अधिकारांचे हनन आहे. आज एकाची पाळी आहे, तर उद्या तुमचीही पाळी येऊ शकते! पोलिस दल हे शस्त्रधारी दल आहे, त्यांना कायद्याने बळाचा वापर करण्याचा अधिकार आहे, जो सामान्य माणसाला नाही, आणि त्यामुळेच आपल्या अधिकारांचा वापर कायद्यानेच करण्याचे त्यांच्यावर बंधन असणे अत्यंत आवश्यक आहे. खरेतर भांडवलशाहीमध्ये लोकशाही म्हणजे फक्त एक बुरखा आहे ज्याला ही व्यवस्था संकटकाळामध्ये कधीही काढून फेकू शकते. देशात सध्या होत असलेल्या पोलिसी कारवायांवरून हे स्पष्ट होते की हा बुरखा गळून पडला आहे. राज्यसत्ता तिचे खरे रूप दाखवत आहे. जर आज या क्रूरतेचा विरोध केला नाही तर जे काही थोडे फार मानवी अधिकार आपल्याला मिळाले आहेत, ते सुद्धा आपण गमावून बसू.

अन्नाच्या शोधात असताना किंवा आरोग्यसेवा घेण्यासाठी जात असताना लॉकडाऊनचे उल्लंघन केल्यामुळे जर पोलीस कोणावर गोळ्या झाडत असतील, मारत असतील, अटक करत असतील किंवा गैरवर्तवणूक करत असतील तर हे मानव अधिकारांचे हनन आहे. प्रत्येक नागरिकाला जन्मतः आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि नागरी अधिकार मिळालेले आहेत. त्यांच्या संरक्षणाशिवाय कोरोनाविषाणूच्या संकटातून बाहेर पडण्याचा वेगळा मार्ग असू शकत नाही. जनतेला वगळून नाही, तर जनसहभागातून; कमी नाही तर जास्त लोकशाहीतून; जनतेला अंधारात ठेवून नाही तर जन-शिक्षणातून; सरकारी अनास्था, बेजबाबदारपणा, असंवेदनशीलतेतून नाही तर संवेदनशीलता, कठोर परिश्रमातून आणि योग्य परिस्थिती निर्माण करून; एकमेकांना शिक्षा देण्याची नाही तर एकमेकांना साथ देण्याची संस्कृती निर्माण करून; नफाकेंद्रित नाही तर सहकारावर आधारित क्रांतिकारी समाजाच्या निर्मितीतूनच अशा रोगांवर मात करण्याचा खरा मार्ग निघू शकतो.

# जॉर्ज फ्लॉइडची अमेरिकेतील पोलिसांकडून निर्घृण हत्या

पान 7 वरून

यंत्रणा लागतेच. भांडवली व्यवस्थेमध्ये केवळ पोलिसांनाच हिंसा करण्याचा कायदेशीर हक्क असतो. बाकी सर्व हिंसा हाणून पाडण्यासाठी पोलिसांच्या हिंसेला कायद्याचे कवच देणे भाग असते. इतकेच नव्हे तर अगोदरच दमित-शोषित असलेल्या वर्गांवर हिंसा करण्यासाठी पोलिसांना उद्युक्त करण्याकरिता देखील भांडवली प्रचारतंत्र काम करते. म्हणजेच, जॉर्ज फ्लॉईडची डेरेक शॉवीनने केलेली हत्या ही त्याला कुठल्या भांडवलदाराचा किंवा शासनसत्तेतील एखाद्या अधिकाऱ्याचा आदेश होता म्हणून न्याय्य वाटते असे नव्हे; तर सरकारी व इतर भांडवली संस्थांनी चालवलेल्या प्रचारामुळे, अमेरिकेतील पोलिसांना स्वतःलाच असे वाटत असते कि अश्वेतांमध्ये (आणि इतर दमित-शोषित वर्ग - गरीब कामगार, मुसलमान इत्यादी) गुन्हेगारी प्रवृत्ती इतरांपेक्षा जास्त आहे, आणि म्हणून पोलिसांचाच असा पूर्वग्रह बनलेला असतो कि हे वर्ग समाजासाठी धोकादायक आहेत. ह्यातून मग ह्या वर्गांबद्दल घृणा, द्वेष, तिरस्कार देखील तयार झालेला असतो. हे केवळ अमेरिकेतच होते असे नाही. 2019 मध्ये भारतात 11,000 हून जास्त पोलिसांच्या एका सर्व्हेमध्ये असे दिसून आले कि जवळपास 50 टक्के पोलिसांना मुसलमान हे स्वभावानेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात असा पूर्वग्रह होता. असे पोलीस अधिकारी कशा प्रकारची कारवाई करत असतील हे उघडच आहे.

जॉर्ज फ्लॉइडच्या हत्येनंतर मात्र जनतेच्या संयमाचा बांध फुटला आहे. अमेरिकेत कोरोनाची साथ थैमान घालत असतानाही पोलिसी अत्याचाराविरुद्ध लाखोंच्या संख्येने लोक रस्त्यांवर उतरले आहेत. ह्यामध्ये अश्वेतांसोबतच श्वेतवर्णीयसुद्धा आहेत. जगभरातून ह्या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. आंदोलन अनेक ठिकाणी हिंसक झाले आहे. आंदोलकांनी पोलीस चौक्या व गाड्या जाळल्या आहेत, अनेक वर्णद्वेषी नेत्यांचे पुतळे पाडले आहेत. अनेक मॉल्स व शोरूम्सची तोडफोड व नासधूस केली आहे. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमध्ये सुद्धा हे आंदोलन पेटले आहे. काही दिवसांपूर्वी वॉशिंग्टनच्या आंदोलकांनी राष्ट्रपतींचे निवासस्थान व कार्यालय असलेल्या व्हाईट हाऊसला घेराव घातला होता. त्यामुळे घाबरून अमेरिकेच्या राष्ट्रपतीला व्हाईट हाऊसचे दिवे मालवून जमिनीखाली बंकर मध्ये काही काळ लपून बसावे लागले होते. पुढच्याच दिवशी सकाळी व्हाईट हाऊस भोवती एक मैल तटबंदी करण्यात आली. परंतु ह्या आंदोलनाच्या दोन मोठ्या मर्यादा आहेत. एक म्हणजे हे आंदोलन स्वयंस्फूर्त आहे, संघटित नाही. त्यामुळे ह्या आंदोलनाला, व आंदोलनरत असलेल्या सर्व जनतेला एकाच नेमक्या दिशेने जाणे अशक्यप्राय आहे, व त्यामुळे आंदोलनाचा प्रभावीपणा, व प्रखरता कमी होते. दुसरे म्हणजे हे आंदोलन सुधारणावादी आहे. कायद्यामध्ये सुधारणा करून नागरिकांना पोलिसी अत्याचारापासून संरक्षण द्यावे, व पोलिसांचे अधिकार व बजेट कमी केले जावे ह्या आंदोलनाच्या मुख्य मागण्या आहेत. हे आंदोलन मूळ रोगाच्या उच्चाटनासाठी नसून केवळ लक्षणांविरोधात लाक्षणिक उपायांसाठीचे आहे. हे आंदोलन केवळ पोलिसी अत्याचाराविरुद्ध आहे. परंतु भांडवली व्यवस्था टिकवून ठेवण्याकरिता शोषित-दमित वर्गांवर वचक ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा, आणि जनतेमध्ये फूट पाडण्यासाठी वर्णभेदाचा वैचारिक वापर ही भांडवली व्यवस्थेची अपरिहार्यता आहे. म्हणजेच भांडवली व्यवस्था आहे तोपर्यंत पोलिसी अत्याचार ह्या ना त्या स्वरूपात कायम राहणारच, आणि म्हणूनच केवळ पोलिसी अत्याचाराविरुद्ध, कायद्यात सुधारणा करून घेण्यासाठी न लढता, जर भांडवली व्यवस्थेच्या समूळ उच्चाटनासाठी संघटित होऊन लढणे हाच ह्या समस्येवरचा कायमस्वरूपी उपाय आहे.

इतकेच नाही तर, वर्ण-जाती-वंश-भाषा आदींचे भेद हे जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये नेहमीच भांडवलदार वर्गाच्या सत्तेला टिकवून ठेवण्याचे एक प्रभावी हत्यार म्हणून वापरले गेले आहेत. यापैकी कोणत्याही भेदांविरोधात उभार घेणाऱ्या भांडवली सत्तेने तेवढेच लढे लढले आहेत जितके भांडवलशाहीच्या विकासासाठी गरजेचे होते (उदा: अमेरिकन सिव्हिल वॉर, ज्यामुळे काळ्या गुलामांचे रुपांतर कामगारांमध्ये करणे शक्य झाले आणि भांडवलशाहीला चालना मिळाली). या भेदांना संपूर्ण संपवणे ही भांडवली व्यवस्थेची गरज नाहीच मुळी आणि आता मक्तेदारी भांडवलशाहीच्या काळात तर हे भेद टिकवणे व त्याद्वारे जनतेमध्ये दुही माजवणे ही एकप्रकारे गरज बनली आहे. यामुळेच सरळसरळ वर्णद्वेषी प्रचार करणारा ट्रंप असो किंवा हिंदुत्ववादी प्रचार करणारा फॅसिस्ट मोदी, हे या भांडवली लोकशाही व्यवस्थांमध्ये भांडवलदार वर्गाने दिलेल्या निधीच्या भरभक्कम पाठिंब्यावरच निवडून येतात. जनतेची एकजूट रोखण्यासाठी, शोषणाचे खरे रूप लपवण्यासाठी, कामगार वर्गाच्या विविध गटांना एकमेकांशी झुंझवत ठेवण्यासाठी अशाप्रकारचे ऐतिहासिक भेद भांडवली राज्यसत्ता नेहमीच वापरत आली आहे आणि म्हणूनच भांडवलशाही अशा भेदांना पूर्णत: नेस्तनाबूत करणे अशक्य आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## जॉर्ज फ्लॉईडची अमेरिकेतील पोलिसांकडून निर्घृण हत्या - पोलिसांचे वर्गचारित्र्य पुन्हा एकदा उघड!

# भांडवली व्यवस्थेने जपलेल्या वर्णव्यवस्थेचा आणखी एक बळी!

✍ निमिष

25 मे 2020 रोजी अमेरिकेतील मिनिआपोलिस शहरामध्ये जॉर्ज फ्लॉईड ह्या कृष्णवर्णियाची एका पोलीस अधिकाऱ्याने निर्घृण हत्या केली. वीस डॉलरची नकली नोट बाजारात वापरल्याच्या संशयावरून पोलीस जॉर्ज फ्लॉईडला ताब्यात घेत असताना त्याने प्रतिकार केल्यावर एका पोलीस अधिकाऱ्याने त्याला रस्त्यावर पाडले व त्याची मान गुडघ्याखाली जवळजवळ 9 मिनिटे दाबून धरली, आणि त्यातच गुदमरून जॉर्ज फ्लॉईडचा मृत्यू झाला. "मला श्वास घेता येत नाहीये" (I can't breathe) हेच त्याचे शेवटचे शब्द होते. जॉर्जची हत्या करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव डेरेक शॉविन असे आहे. डेरेकने दिवसाढवळ्या, शहराच्या एका वर्दळीच्या रस्त्यावर ही हत्या केली. नऊ मिनिटे जेव्हा डेरेकने जॉर्जची मान गुडघ्याखाली धरली होती, तेव्हा त्याच्या बरोबर असणारे इतर तीन पोलीस अधिकारी केवळ मूकदर्शक बनून उभे होते. रस्त्यावरच्या नागरिकांनी अनेकदा डेरेकला व इतर पोलिसांना जॉर्जला तपासायला सांगितल्यावरसुद्धा ह्या मुजोर पोलिसांनी काहीही केले नाही. जॉर्ज मृत झाल्याचे लक्षात आल्यावर त्याला अँब्युलन्समधून इस्पितळात नेण्यात आले. ही सर्व घटना काही नागरिकांनी आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यातून रेकॉर्ड केली आहे. या हत्येने मोठ्या प्रमाणात अमेरिका आणि जगभरामध्ये वर्णद्वेषविरोधातील आंदोलनाला पुन्हा चालना दिली आहे, अमेरिकेतील वंशवादाला जागतिक चर्चेचा मुद्दा तर बनवलेच आहे, सोबतच पोलिस दलाचे वर्गचरित्र आणि भांडवली व्यवस्थेच्या वंशवादासहित सर्व सामाजिक भेदांविरोधात लढण्याच्या मर्यादाही पुन्हा एकदा उघड पाडल्या आहेत.

अमेरिकेतील पोलिसांकडून अश्वेत नागरिकांवर अत्याचार व बेकायदेशीर, अमानुष हत्या होतच आल्या आहेत. इतर कोणत्याही भांडवली-लोकशाही देशाप्रमाणेच अमेरिकेतील पोलिसांचा इतिहास बघितला तर अमेरिकेतील पोलीस व्यवस्था ही अश्वेत गुलामांच्या दडपशाहीसाठी आणि गुलामी व्यवस्था संपल्यानंतर कामगार-कष्टकऱ्यांच्या दडपशाहीसाठीच बनवलेली व्यवस्था आहे हे लक्षात येईल. अठराव्या शतकात अमेरिकेत गोऱ्या नागरिकांमधूनच, अश्वेत गुलामांवर नजर ठेवण्यासाठी, आणि नियम कायदे मोडणाऱ्या, किंवा मालकांच्या तावडीतून पळून जायचा प्रयत्न करणाऱ्या गुलामांना शिक्षा करण्यासाठी काही तुकड्या बनवल्या गेल्या. गुलामांचा उठाव होऊ नये म्हणून दहशतीचे वातावरण तयार करून ठेवणे हे सुद्धा ह्या तुकड्यांचे काम होते. ह्या तुकड्या हेच अमेरिकेतील पोलीस यंत्रणेचे प्राथमिक स्वरूप होय. अश्वेत गुलामांचे रुपांतर 'स्वतंत्र' कामगारांमध्ये करण्याच्या वर्गप्रेरणेने अमेरिकेत 1861-65 या काळात उत्तर अमेरिका विरुद्ध दक्षिण अमेरिका असे अमेरिकन नागरी युद्ध (सिव्हिल वॉर) झाले. त्यानंतर 1865 मध्ये अमेरिकेतील गुलामी प्रथा संपुष्टात आल्यानंतरसुद्धा कृष्णवर्णीयांना समान हक्क दिले गेले नाहीत. अश्वेत मोठ्या प्रमाणावर गोऱ्यांच्या कारखान्यांमध्ये कामगार म्हणून काम करू लागले. गुलामी संपल्यानंतरही गोऱ्यांचे वर्चस्व आणि अधिसत्ता अबाधित राखण्याचे काम पोलिसांनीच केले. ह्या काळात येईपर्यंत अमेरिकेमध्ये एक शक्तिशाली व्यापारी आणि उद्योजक वर्ग तयार झाला होता. ह्या वर्गाना आपल्या व्यापाराचे व कारखान्यांचे कामगारांच्या उठावांपासून, ज्यामध्ये सर्वाधिक शोषित-दमित अश्वेत कामगारही सामील होते, संरक्षण करणे गरजेचे होते. साहजिकच भांडवली राज्यसत्तेने पोलिस दल या कामी लावले. ह्या काळात अमेरिकेत आर्थिक असमानता प्रचंड वेगाने वाढत होती. कामाचे तास वाढवून, आणि कामगारांच्या सुरक्षेकडे कानाडोळा करून कामगारांचे शक्य तितके शोषण केले जात होते. अत्यंत कमी मजुरी देऊन कामगारांना पिळवटून काढले जात होते. ह्यामुळे कामगारांनी अनेकवेळा संप केले. एकट्या न्यूयॉर्क शहरातच 1880 ते 1900 ह्या वीस वर्षांमध्ये 5000 पेक्षा जास्त संप झाले. अशा वातावरणात कामगारांच्या अनेक उठावांना दंगल घोषित करून त्यांना दडपण्यासाठी, अनेक संपांना मोडून काढण्यासाठी पोलीस यंत्रणेचा वापर केला जात असे. ह्याच काळात कृष्णवर्णीयांवर "धोकादायक वर्ग" असा शिक्का मारला गेला. पोलीस यंत्रणा अमेरिकेत अपघात "रोखण्यासाठी" धोकादायक वर्गांवर नजर ठेवणे, धोकादायक वर्गातील व्यक्तींना रस्त्यात अडवून त्यांची तपासणी घेणे असे प्रकार करू लागली. संप रोखण्यासाठी पोलिसांनी अटकसत्र सुरु केले. लाखो कामगारांना "सार्वजनिक सुव्यवस्था" धोक्यात आणल्याचं निमित्त करून जेलमध्ये कोंबण्यात आले. 1875 ते 1900 ह्या काळात शिकागोच्या किमान दहा लाख कामगारांना जेलमध्ये ठेवले जात होते. हे सर्व करत असतानाच स्थानिक व्यापाऱ्यांकडून व छोट्या उत्पादकांकडून "राजकीय निधी" उकळणाऱ्या गोऱ्या तरुणांच्या गुंड टोळ्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष करणं, स्वतः लाचखोरी करून निवडणुकांमध्ये घोटाळे करणं, मोठ्या टोळ्यांच्या म्होरक्यांकडून खंडणी वसूल करणं, माफियांना संरक्षण पुरवणं, मादक पदार्थांच्या व्यापाराची, मानव तस्करीची व अनधिकृत वेश्याव्यवसायाची केंद्रे असणाऱ्या भव्य जुगारअड्ड्यांची सुरक्षा करणं इत्यादी कामं नेमाने पोलीस करत होतेच, व 'अधिकृत गुंडांचे' हे काम आजतागायत करत आले आहेत.

1960 च्या दशकामध्ये अमेरिकेत कृष्णवर्णीयांसाठीच्या समान हक्कांची चळवळ झाली तेव्हा देखील ही चळवळ मोडून काढण्यासाठी पोलिसांनी असंख्य कृष्णवर्णीयांना ताब्यात घेतले व त्यांच्यावर अगणित अत्याचार केले. गुन्हेगारी "रोखण्यासाठी" गुन्हे घडण्याअगोदरच सक्रिय असणारी ही पोलीस यंत्रणा, ह्या चळवळीतील अनेक मोठ्या नेत्यांच्या हत्या (मार्टिन लुथर, माल्कम एक्स, मेडगर एव्हर्स) रोखण्यात केवळ अपयशी ठरली इतकेच नव्हे, तर मार्टिन लुथर वा माल्कम एक्सच्या हत्येच्या कटात पोलीस यंत्रणा सहभागी होती हे आता उघड गुपित आहे. प्रत्येकच वेळी संपांचा व चळवळींचा बिमोड करण्यासाठीचे सशस्त्र बळ हीच पोलिसांची भूमिका व चारित्र्य राहिले आहे. मग ते कामगारांनी त्यांच्या हक्कांसाठी केलेले संप असोत, कृष्णवर्णीयांनी त्यांच्या समान हक्कांसाठी केलेली चळवळ असो, किंवा अमेरिकेने व्हिएतनामवर पुकारलेल्या युद्धाच्या विरोधातला उठाव असो. अमेरिकेतील गुन्हेगारीच्या अनेक अभ्यास व अहवालांतून आता असे दिसून आले आहे कि पोलीस यंत्रणा असण्याने गुन्हेगारीवर नगण्य फरक पडतो. परंतु हे मात्र निश्चित की रस्त्यांवरती एका सशस्त्र दलाचे अस्तित्व जाणवत असल्याने संप, उठाव, चळवळी, अशा मालकवर्ग किंवा त्यांची सत्ता डळमळीत करू शकेल अशा प्रकारच्या घटनांना आळा बसतो, व एखादी घटना घडलीच तर सफाईदारपणे तिचा बिमोड करता येतो. आजच्या घडीला अमेरिकेतील अनेक राज्यांच्या सत्ताधारकांकडून पोलीस खात्यावर केला जाणारा खर्च हा जनतेच्या आरोग्य व शिक्षणासाठी केल्या जाणाऱ्या खर्चापेक्षा कैकपटीने जास्त आहे. पोलिसांना लष्करी फौजेसारखेच रायफली, हातबॉम्ब, इतकेच काय, रणगाडे सुद्धा दिले जातात. कुठली 'गुन्हेगारी' थांबवण्यासाठी रणगाडे वापरले जातील हे स्पष्ट आहे.

हे केवळ अमेरिकेतच घडते असे नव्हे. भारतात देखील ह्यापेक्षा फार वेगळी परिस्थिती नाहीच. भारतात सुद्धा, कामगारांचे, शेतमजुरांचे उठाव मोडून काढण्यासाठी, दलित, मुसलमान, आदिवासींवर दडपशाही करण्यासाठी पोलिसांचा नियमितपणे वापर केला गेला आहे. भारतातील आधुनिक पोलीस यंत्रणेची सुरुवातच 1857 च्या उठावानंतर, भारतीय जनतेवर वचक ठेवण्यासाठीच केली गेली होती. त्या काळात ब्रिटिशांना भारतीय जनतेतील विद्रोह, उठाव, आंदोलने, चळवळी, व थोडक्यात ब्रिटिश शासकांना धोकादायक असे सर्व काही मोडून काढायला एक यंत्रणा विकसित करणे गरजेचे होते. ती यंत्रणा बनवण्यासाठी 1861 मध्ये भारतीय पोलीस कायदा (इंडियन पोलीस ॲक्ट) बनवला गेला. आजही पोलीस खाते ह्याच कायद्याच्या आधारावर चालते. संप, किंवा निदर्शने करणाऱ्या कामगारांना ताब्यात घेतल्याची, त्यांच्यावर पाण्याचा फवारा, अश्रूधूर वापरल्याची अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला आहेतच. वेदान्ताच्या विषारी प्लांट विरोधात दोन वर्षांपूर्वी तामिळनाडूमध्ये झालेल्या निदर्शनांवर पोलिसांनी जो गोळीबार केला त्यात 13 लोकांचा मृत्यू झाला, पण आजपर्यंत एकाही पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत. देशभरातील आदिवासी भागांमध्ये विशेष राखीव पोलिसांनी (Special Reserve Police) किती अत्याचार केले आहेत ते आता पुन्हा सांगण्याची गरज नाही. आदिवासींना मारहाण, जाळपोळ, बलात्कार ह्या भागांमध्ये राजरोसपणे केले जात व अजूनही जातात. महाराष्ट्रातील आदिवासी भागांमध्ये नक्सलविरोधी कारवायांमध्ये पोलिसांकडून आदिवासींची अगणित वेळा हत्या होते. दलित, मुसलमान विरोधी दंगलींमध्ये पोलीस नेहमीच आरोपींकडे कानाडोळा करतात, व अनेकदा दंगलींमध्ये सक्रियपणे सहभागी देखील असतात. फॅसिझमच्या उभारासोबतच पोलिस दलांचे फॅसिस्ट शक्तींसोबत असलेले संबंधही लपलेले नाहीत. 2002 मध्ये गुजरात दंगलीच्या वेळी अहमदाबाद मधील मदरश्यांमध्ये जाळपोळ केल्यानंतर बजरंग दलाच्या गुंडांनी "ये अंदर कि बात है, पुलिस हमारे साथ है, बजरंग दल जिंदाबाद, नरेंद्र मोदी जिंदाबाद" असे भिंतींवर लिहून ठेवले होते. ह्याच वर्षी फेब्रुवारीमध्ये दिल्लीत झालेल्या दंगलीत पोलिसांनी मुसलमानांवर गोळीबार केल्याची, मारहाण केल्याची दृश्ये अद्याप ताजीच आहेत. ग्रामीण भागांमध्ये सुद्धा धनाढ्य शेतकऱ्यांनी पोसलेल्या गुंडांच्या टोळ्यांशी (उदा. रणवीर सेना) पोलिसांची कशी मिलीभगत असते हे आता सर्वांना ठाऊकच आहे. ह्या टोळ्या शेतमजुरांवर वचक ठेवण्याचेच काम मुख्यतः करत असतात, व शेतमजुरांमध्ये बहुतांशी दलितच ह्या टोळ्यांच्या हिंसेच्या केंद्रस्थानी असतात. अनेकदा पोलिसांकडून "फेक एन्काउंटर" देखील घडवून आणले जातात. सरकारच्याच एका आकडेवारीनुसार 2009 ते 2012 ह्या तीन वर्षांमध्ये 555 अशा केस आहेत ज्या फेक एन्काऊंटर असण्याचा संशय आहे. कोरोनाच्या दोन महिन्यांच्या लॉकडाउनच्या काळात देखील शासनाला विरोध करणाऱ्या अनेक विचारवंतांची विद्यार्थ्यांची व कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली आहे. लॉकडाउनच्या अगोदर झालेल्या सीएए-एनआरसी विरोधी आंदोलनातील अनेक कार्यकर्त्यांना व नेत्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. ह्याच संदर्भात जामियाची विद्यार्थिनी सफुरा झरगर हिला तर गरोदर असूनदेखील कोठडीत ठेवले आहे, दुसरीकडे शाहीन बाग मध्ये गोळीबार करणाऱ्या कपिल बैसला ह्या युवकाला निव्वळ 25 हजारांच्या जामिनावर सोडून दिले आहे. नुकतेच उत्तर प्रदेशातील कुख्यात गुंड विकास दुबे याला पकडल्यानंतरही त्याचे राजकारणी आणि इतर सत्ताधाऱ्यांशी असलेले संबंध लपवले जावेत म्हणून त्याचेही एनकाउंटर केले गेले. पोलीस खात्यातली लाचखोरी, मुजोरपणा, दिरंगाई, ढिसाळपणा, त्यांचे बड्या गुंडांशी, बदमाशांशी, नेत्यांशी, व नेत्यांनी पोसलेल्या टोळ्यांशी असणारे साटेलोटे, दलालांशी, बिल्डरांशी, जमीनदारांशी असणारी जवळीक आता सर्वज्ञात आहेत.

19 जून रोजी तामिळनाडू मध्ये झालेल्या जयराज आणि बेनिक्स ह्या पिता-पुत्रांच्या हत्या हे पोलिसांच्या अमानुषतेचे ताजे उदाहरण. जयराज आणि बेनिक्स तामिळनाडूच्या तुतिकोरिन मध्ये मोबाईल दुरुस्तीचे छोटे दुकान चालवत असत. लॉकडाऊन मध्ये आपले दुकान अधिकृत वेळेनंतर उघडे ठेवल्याचे निमित्त करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पोलीस कोठडीत त्यांच्यावर भयानक अत्याचार केले गेले. पोलिसांनी दोघांचा लैंगिक छळ देखील केला. ह्यातच त्यांचा मृत्यू झाला. भारतात दर वर्षी हजारो कैद्यांचा ह्या ना त्या कारणाने कैदेत मृत्यू होतो. ताज्या आकडेवारीनुसार न्यायालयीन आणि पोलीस कोठडी दोन्ही मिळून 2018-19 ह्या एका वर्षात 1933 कैद्यांचा मृत्यू झालेला आहे. इतक्या मोठ्या संख्येने मृत्यू होत असले, तरी कारवाई मात्र नगण्यच होते. पोलीस कोठडीत 2001 ते 2018 ह्या काळात 1700 पेक्षा जास्त मृत्यू झालेले आहेत, परंतु कारवाई फक्त 26 पोलिसांवरच झालेली आहे. जयराज आणि बेनिक्सच्या हत्येनंतर तामिळनाडू व संपूर्ण दक्षिण भारतामध्ये पोलिसांच्या हिंसेविरोधात मोठा उठाव झाल्यानंतरच संबंधित पोलिसांवर कारवाई करण्यात आली.

राजकीय कैद्यांना तर ह्याहीपेक्षा जास्त अत्याचारांना सामोरे जावे लागते. 80 वर्षांचे तेलगू कवी वरवरा राव ह्यांना जवळजवळ 2 वर्षं तळोजा जेल मध्ये ठेवण्यात आलेले आहे. ह्या काळात त्यांची प्रकृती वेगाने खालावली आहे. त्यांचे मानसिक संतुलन ढासळत आहे. तरीही कुठलेही वैद्यकीय उपचार न करता, कोरोनाच्या साथीच्या काळात सुद्धा पोलिसांनी त्यांना क्षमतेपेक्षा जास्त भरलेल्या जेलमध्येच ठेवले आहे. जनतेच्या दबावाखातर पोलिसांना काही दिवसांपूर्वीच वरवरा रावना दवाखान्यात दाखल करावे लागले, व ते कोरोना बाधित झाले असल्याचे देखील समोर आले आहे. उत्तर प्रदेशचे डॉक्टर कफील खान ह्यांना देखील त्यांच्या एका भाषणाचे निमित्त करून बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्याखाली (यूएपीए) तुरुंगात डांबले आहे. कफील खाननी एनआरसी-सीएए कायद्यांचा प्रखरतेने विरोध केला होता. तुरुंगातून त्यांनी नुकत्याच लिहिलेल्या एका पत्रात असे म्हणले आहे कि पोलिसांकडून माझी हत्या करवून नंतर मी आत्महत्या केल्याचे दाखवले जाईल अशी शक्यता आहे.

केवळ भारत वा अमेरिकेतच नव्हे, तर सर्वच देशांमध्ये पोलीस यंत्रणेचा वापर हा गुन्हेगारी विरोधात कमी, आणि शोषित वर्गांवर नजर व धाक ठेवण्यासाठीच अधिक केला जातो. भांडवलदारांचे व भांडवली सत्तेचे दमन जसजसे वाढत जाते तसतसे आर्थिक-सामाजिक दमित-शोषित वर्गातील अस्वस्थता देखील वाढत जाते. ही अस्वस्थता उफाळून येऊन उठावाचे, आंदोलनाचे रूप घेऊ नये, आणि भांडवलदार वर्गाच्या व भांडवली सत्तेच्या अस्तित्वाला धोकादायक बनू नये ह्यासाठी ह्या वर्गांमध्ये भय उत्पन्न करण्यासाठी, त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी, आणि वेळ पडल्यास त्यांच्यातील उठावांना मोडून काढण्याकरिता हिंसा करण्यासाठी म्हणून भांडवलदार वर्गाला व भांडवली सत्तेला पोलीस

पान 6 वर

# भांडवली व्यवस्था नष्ट केल्याशिवाय कामगार वर्गाला न्याय मिळणे शक्य नाही!

पान 1 वरून

पर्यंत हा रोग जगाच्या 125 पेक्षा जास्त देशांमध्ये पसरलेला होता, तोपर्यंत भारतातील सरकारं झोपली होती. परदेशातून आलेल्या लोकांच्या कोरोना-चाचण्या सुद्धा चालू झालेल्या नव्हत्या. फक्त काही देशांतून येणाऱ्या प्रवाशांचा ताप पाहिला जात होता. आता तर आय.सी.एम.आर या देशातील वैद्यकीय संशोधन संस्थेने सुद्धा मान्य केले आहे की हे फारच अपुरे होते. 17 मार्च रोजी पहिल्यांदा अंतर पाळण्याबद्दल सरकारने निर्देश दिले. 22 मार्च रोजी लॉकडाऊन जाहीर करतेवेळी कोरोना जगातील जवळपास 150 देशांपर्यंत हा रोग पोहोचलेला होता. कोणत्याही पूर्वतयारी शिवाय, अत्यंत तातडीच्या मार्गाने सरकारने लॉकडाऊन जाहीर केला कारण निश्चितपणे अगोदरच उशिर झालेला होता!

याचार परिणाम आहे की भारतामध्ये लॉकडाऊन पूर्णपणे अयशस्वी ठरला आहे. लॉकडाऊन हे अशा प्रकारच्या रोगांशी लढताना शेवटचे आणि जालीम हत्यार आहे. अगोदरच झालेल्या उशिरामुळे आणि हलगर्जीपणामुळे मोदी सरकारने हे हत्यार मार्च मध्ये उपसले. परंतु लॉकडाऊनच्या काळामध्ये साथ किती पसरली आहे त्याचा अंदाज येण्यासाठी ज्या स्तरावर चाचण्या होणे अपेक्षित होते, त्या अजूनही होत नाहीयेत! चाचण्या करणे, संशयित आणि रोगग्रस्त लोकांना चांगल्या दर्जाच्या विलगीकरणात नेणे आणि स्वच्छता, अंतर या करिता सुविधा उपलब्ध करून देणे या सर्वच बाबतींमध्ये मोदी सरकार आणि राज्य सरकारे पूर्णत: अपयशी ठरली आहेत. याचाच परिणाम आहे की जवळपास तीन महिने लॉकडाऊन करूनही कोरोनाला थांबवता आले नाही, उलट आज भारत जगात कोरोना बाधितांच्या रांगेत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे आणि जगातील सर्वाधिक कोरोना बाधित देश होण्याकडे वाटचाल चालू आहे.

असे का झाले? मोठ्या प्रमाणावर चाचण्या, संपर्क तपासणे आणि क्वारंटाईन करणे तेव्हाच शक्य होते जेव्हा सरकारने यामध्ये निधी ओतला असता. परंतु उद्योगपतींना लाखो कोटींची कर्जमाफी आणि करमाफी देणारी सरकारं मात्र जनतेच्याच पैशातून उभ्या राहिलेल्या सरकारी बजेटचा नाममात्र हिस्सा आरोग्य सुविधेवर खर्च करू इच्छित आहेत. कोरोना पसरल्यानंतरही मोदींनी नेहमीप्रमाणे मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या 20 लाख कोटींच्या पॅकेज मध्ये खरंतर 1 ते 2 लाख कोटी रुपयेच नवीन रक्कम आहेत, बाकी सर्व अगोदरच्याच सरकारी खर्चाला नव्या रुपात सादर केले आहे. या रकमेपैकी सुद्धा मोठा हिस्सा मध्यम, मोठे भांडवलदार यांना कर्ज देणे किंवा लोखंड, कोळशासारख्या खाणी कवडीमोल भावाने आंदण देण्यासाठीच आहे. थोडक्यात कोरोनाशी लढण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारं जनतेकरिता निधी खर्चच करू इच्छित नाहीयेत, तेव्हा कोरोनाला थांबवण्यात सरकारला आलेले अपयश हे त्यांच्या भांडवली व्यवस्थेच्या रक्षकाच्या भुमिकेमुळे आहे हे स्पष्ट आहे.

### कोरोनाशी लढणाऱ्यांप्रती दिखाव्याचे ममत्व

या सर्व काळामध्ये जनतेला भ्रमित करण्यासाठी थाळ्या वाजवा, मेणबत्त्या लावा सारख्या प्रकारांमध्ये मोदीनी जनतेला गुंतवण्याचा प्रयत्न केला. कोरोना सारख्या महामारीचा सुद्धा 'इव्हेंट' बनवून स्वत:च्या प्रसिद्धीसाठी वापर करून खऱ्या प्रश्नांना लपवण्याचे काम यथायोग्य केले गेले. कोरोनाशी लढणारे आरोग्य कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी इत्यादींचे मनोधैर्य वाढवण्याचे निमित्त सरकारने सांगितले. दवाखान्यांवर पुष्पवृष्टी करण्याचा दिखावाही केला. परंतु खरोखर मोदी सरकारला त्यांची काळजी असती तर त्यांनी सर्व डॉक्टर्स, नर्सेस, स्वच्छता कामगार, परिवहन सेवेतील कर्मचारी अशा सर्वांना ज्यांना लॉकडाऊन मध्ये सुद्धा कामावर जाणे भाग होते, तातडीने पी.पी.ई. कीट सहीत सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या असत्या, त्यांचे पगार वेळच्या वेळी केले असते आणि संरक्षण दिले असते. वास्तव हे आहे की देशाच्या अनेक भागांमध्ये अनेक ठिकाणी डॉक्टर, नर्सेस, परिवहन कर्मचारी, सफाई कर्मचारी इत्यादींनी ग्लोव्हस, मास्क, पीपीई कीट उपलब्ध होत नसल्यामुळे आंदोलन केले. आंदोलनांची दखल घेणे तर दूर, आंध्र मध्ये तर एका डॉक्टरवर सरकार विरोधात बोलल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला.

सफाई कामगारांना तर आजही देशाच्या बहुतांश भागांमध्ये पी.पी.ई. कीट सोडाच, साधे एन95 मास्क आणि ग्लोव्हस सुद्धा दिले गेलेले नाहीत. बस, रेल्वे चालवणाऱ्या परिवहन कामगारांची तर गणतीच नाही ही स्थिती आहे. दुसरीकडे आय.ए.एस. अधिकारी मात्र पीपीई कीट घालून काम करत आहेत. याचे कारण पुन्हा एकच आहे - सार्वजनिक आरोग्यावर खर्च न करता खाजगी आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्याचे धोरण.

### कोरोना काळात कामगार वर्गावर चहुबाजूने संकटे

तडकाफडकी जाहीर केलेल्या आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त चाललेल्या लॉकडाऊनमुळे, थांबलेल्या आर्थिक चक्रामुळे सर्वाधिक फटका बसला आहे तो कामगार-कष्टकरी वर्गाला. एका बाजूला प्रचंड मोठ्या प्रमाणात उद्योग बंद झाल्यामुळे बेरोजगारीचा दर 30 टक्क्यांवर गेला आहे. अचानक आलेल्या 3 महिन्यांच्या लॉकडाऊनने तर बहुसंख्य प्रवासी कामगारांची कंबरच मोडली. राशन पुरवण्याच्या सरकारी घोषणा अनेक ठिकाणी फक्त कागदावर राहिल्या आहेत आणि कामगार भुकेने बेहाल आहेत. दुसरीकडे घरभाडे देणे, वीजेचे बील भरणे, मुलांच्या शाळांचा खर्च करणे या सर्व खर्चांचा डोंगर आ वासून समोर उभा आहे. लॉकडाऊन उठणे चालू झाल्यावर एकतर काम मिळत नाहीये किंवा असेल तर ठेकेदार वा मालक मजुरी वाढवायला तयार नाहीयेत, उलट आपापसात संघटीत होऊन कामगारांची मजुरी पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि या सर्वांमध्ये कोरोना झालाच तर इलाजाची सोयच नाहीये कारण मुंबई, पुण्या सारख्या महानगरांमध्ये तर सर्व दवाखाने पूर्ण क्षमतेने भरले आहेत. क्वारंटाईन केंद्रांची हालत तर विचारूच नये इतकी भीषण आहे. झोपडपट्ट्यांमधून आलेल्या संशयित पेशंटना जनावरांसारखी वागणूक अनेक ठिकाणी दिली जात आहे, अन्नामध्ये अळ्या, किडे सापडत आहेत आणि अनेक क्वारंटाईन केंद्र तर इतकी गर्दीची आहेत की निरोगी माणुस तिथे जाऊन आजारी पडेल. थोडक्यात कामगार वर्गाला कुत्र्याचे मरण मरण्यासाठी सरकारने सोडले आहे.

### भांडवलदारांच्या सरकारांना फक्त उच्चभ्रू, श्रीमंत आणि भांडवलदार, मालक वर्गाचीच काळजी

राजस्थानातील कोटा येथे उच्च-मध्यमवर्गीयांची मुलं आय.आय.टी. परिक्षेच्या तयारीसाठी जातात. भर लॉकडाऊन मध्ये या मुलांना घरी जाण्यासाठी ए.सी. बसची सोय सरकारने केली. विदेशात विविध ठिकाणी अडकून पडलेल्या भारतीय नागरिकांना विमानाने परत आणण्याची सोय केली. स्वत:च्या पक्षाच्या अनेक नेत्यांना विशेष विमानाने भाजपने प्रवास घडवला. डी.एच.एफ.एल. कंपनीचे 'येस बॅंक' प्रकरणातील घोटाळेबाज उद्योगपती धीरज आणि कपिल वाधवान यांच्या कुटुंबाला सर्वाधिक कोरोनाग्रस्त महाराष्ट्रामध्ये अधिकारी अमिताभ गुप्ता यांनी महाबळेश्वरला जाण्यासाठी विशेष शिफारशीचे पत्र दिले. श्रीमंत वर्गाची सेवा करण्यात केंद्र आणि राज्य सरकारांनी कोणतीही कसर सोडली नाही.

**दुसरीकडे शेकडो पैल पायी चालत आपापल्या गावी परत जाणाऱ्या प्रवासी कामगारांच्या जीव हेलावून टाकणाऱ्या चित्रांनी देशाच्या इतिहासावर कधी न पुसता येण्यासारखा डाग सोडला आहे.** फाळणीनंतर अशा प्रकारचे कोट्यवधी लोकांचे विस्थापन त्याच पाशवी दिवसांची आठवण करून देणारे होते. आईच्या सुटकेस वर झोपून जाणारा मुलगा आणि त्याला ओढत नेणारी त्याची आई, मेलेल्या आईच्या मृतदेहासमोर शोक करणारं तिचं बाळ, फाटक्या चपलांनी आणि अनवाणी उन्हातान्हात चालत जाणारे मजुरांचे तांडे - हे सगळे पाहूनही फक्त भांडवलदारांची दलाली करणयत गुंतलेल्या सरकारांना ढिम्म फरक पडला नाही. जनतेला लॉकडाईन मध्ये रामायण, महाभारत पहा सांगणारे सरकार आणि आलिशान घरांमध्ये टीव्ही पहात फोटो काढवणारे त्यांचे मंत्री यांना जनतेशी काहीही देणेघेणे राहिलेले नाही.

शेकडो कामगार भुकेने हालहाल होऊन या प्रवासात ठार झाले. सामान्य जनतेने सोशल मीडीयावर या बातम्यांना वाचा फोडल्यावर सुद्धा अगदी थोड्या नफेखोर भांडवली मीडिया चॅनेल्सनी याच्या बातम्या प्रसारित केल्या आणि बहुसंख्यांनी तर या बातम्या दाबण्याचेच काम केले. देशभरामध्ये प्रतिक्रिया निर्माण होणे चालू झाल्यावर मोदी सरकारने ट्रेन सोडण्याची घोषणा केली. सोडल्या त्या ही अपुऱ्या, कामगारांकडून शेकडो रुपयांचे भाडे वसूल करून, आणि आगीतून फुफाट्यात पडल्यासारखे वाटावे या पद्धतीने ह्या ट्रेन्स चालवल्या गेल्या. अनेक ट्रेन तर 2-3 दिवस कुठेही भरकटत होत्या आणि त्यात बसलेले कामगार भूक आणि उन्हाने तडफडत होते.

आता जेव्हा साथ प्रचंड पसरलेली आहे, तेव्हा लॉकडाऊन उठवला जात आहे, तेव्हा लॉकडाऊन उठवण्यामागे जनतेचे कोणतेही हित हे उद्दिष्ट नाही तर उद्योगपती-ठेकेदार-बिल्डर अशा भांडवलदारांचे हित साधणेच आहे. उद्योगपतींच्या धंद्याचे थांबलेले चक्र आणि नफ्याची वाढ या लॉकडाऊनमुळे संकटात आली होती. त्यामुळे या वर्गाच्या एका मोठ्या हिश्श्याने कोरोना आजार कसा फार धोकादायक नाही किंवा लॉकडाऊन सारखे प्रकार का चुकीचे असतात याबद्दल भांडवली मीडियाला हाताशी धरून प्रचार सुरू केला. दुसरीकडे भांडवली अर्थव्यवस्थेची थंडावलेली गाडी तातडीने पुन्हा चालू करण्यासाठी भांडवलदार वर्गाचे रक्षक असलेल्या मोदी सरकारने सुद्धा पूर्वीपेक्षा अनेक पटींनी आजार पसरलेला असताना लॉकडाऊन उठवून जनतेचा जीव धोक्यात घालण्याचे काम केले आहे.

### रोग लपवून उद्योग चालू करण्यासाठी केले जात असलेले विविध प्रकार

अशा भीषण परिस्थितीत महाराष्ट्रातील कॉंग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादीचे सरकार असो, गुजरात मधील भाजपचे, राजस्थानातील कॉंग्रेसचे, बंगालातील ममता बॅनर्जीचे किंवा केंद्रातील मोदीचे - या सर्व सरकारांनी मिळून कोरोनाचा आकडा कमीत कमी कसा दाखवता येईल आणि स्वत:च स्वत:ची पाठ कशी थोपटून घेता येईल याची स्पर्धा लावली आहे.

पहिले तर प्रत्येक शहरामध्ये मर्यादीत संख्येनेच टेस्ट केल्या जात आहेत आणि त्यांचा 'कोटा' ठरवून दिला आहे. त्यामुळे या संख्येपेक्षा जास्त पेशंट असूच शकत नाहीत. अजूनही भारतात 1 ते 2 लाखांपेक्षा जास्त चाचण्या करण्याची क्षमता नाही. दुसरीकडे कोरोनाची चाचणी न होता मरण पावलेल्या व्यक्तींची कोरोना चाचणी न करण्याचे धोरण सगळीकडे लागू केले गेले आहे. मार्च-एप्रिल च्या काळामध्ये सरकारी दवाखान्यांमध्ये पोस्टमार्टेम करताना कोरोना संशयितांची चाचणी होत होती, पण आता ती सुद्धा बंद केली गेली आहे. महाराष्ट्रामध्ये भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईमध्ये अनेक कोरोना मृत्यू लपवल्या गेल्या बद्दल ओरड केली, जी खरी आहे, पण भाजपचे राज्य असलेल्या गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश अशा राज्यांमध्ये अशाच प्रकारांनी मृत्यूंचा आकडा लपवला जात आहे. रोगाचा हा आकडा लपवून सरकारं एका बाजूला बेपर्वाईने जनतेला मृत्यूच्या दारात ढकलत आहेत, तर दुसरीकडे उद्योगपतींसाठी आटोकाट प्रयत्न करून, जनतेला भ्रमात ठेवून, उद्योगधंदे चालू करण्याच्या प्रयत्नात आहे. अगोदर 'कोरोनाला हरवण्याची' गोष्ट करणारी सरकारं जेव्हा 'कोरोना सोबत जगण्याची' भाषा करू लागली आहेत, 'उद्योग पुन्हा चालू करता येतील, पण लोकांचे जीव महत्वाचे आहेत' असे म्हणणारे भाजपचे मुख्यमंत्री शिवराज चव्हाण धादांत खोटं बोलत जेव्हा म्हणू लागले की 'कोरोना बरा होऊ शकतो, घाबरू नका' तेव्हा हे समजून घ्यावे की आता जनतेला हरवून भांडवलदारांना जिंकवण्याच्या नेहमीच्या कार्यक्रमाला ते चालना देत आहेत.

### आता कामगार कायद्यांमध्ये बदल

कोरोनामुळे भांडवली अर्थव्यवस्थेचे चाक गाळात रुतले आहे. कधी नव्हे अशी मंदी सुरू झाली आहे. मंदीचा सर्वाधिक फटका बसणार आहे तो बेरोजगारीमुळे सर्व कामगार-कष्टकऱ्यांना, युवकांना. पण भाजप-शिवसेना-कॉंग्रेस-राष्ट्रवादी सारख्या पक्षांना वाचवायचे आहे ते भांडवलदार वर्गाला. मालकांच्या नुकसानीची भरपाई कामगारांच्या रक्ता-घामातून करवण्यासाठी आता यांनी सर्व कामगार कायदे गुंडाळून टाकण्याची सुरूवात केली आहे. युनियन बनवण्याचा अधिकार, कामाचे तास जास्तीत जास्त 8 असण्याचा अधिकार, अशा सर्व अधिकारांना रद्द करण्याचे कायदे यांनी करू घातले आहेत. उत्तरप्रदेशातले योगीचे भाजप सरकार असो वा राजस्थानातले कॉंग्रेस सरकार, यांच्यामध्ये तर स्पर्धाच लागली आहे सिद्ध करण्याची की भांडवलदार वर्गाचे हित सर्वात पहिले कोण साधणार!

### संकटाचे संधीत रुपांतर – कोरोनाचाही धंदा!

उद्योगपतींची संघटना असलेल्या आय.सी.सी. (इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स) या संघटनेच्या मंचावरून कोरोनाच्या संकटाच्या काळात प्रधानमंत्री मोदींनी भाषण केले. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रधानमंत्र्याने अशा संघटनेच्या मंचावरून भाष्य केले. भांडवलदारांच्या सेवेमध्ये नागडेपणाने उभे राहण्याचे काम करताना मोदींनी त्यांना सल्ला दिला की त्यांनी कोरोनाच्या "संकटाचे संधीत रुपांतर" करावे. फॅसिस्ट भाजप सारखे सरकार एवढ्या खंबीरपणाने मागे असताना काय भिती? आणि या सल्ल्याची गरजही काय. या अगोदरच भांडवलदारांनी मास्क पासून ते हॉस्पिटलच्या इलाजापर्यंत नफेखोरीची एकही संधी सोडलेली नाही. बाबा रामदेव सारख्या आयुर्वेदाचा धंदा करणाऱ्या उद्योगपती आणि ढोंगी साधूने तर कोरोनावर 100 टक्के इलाज सापडल्याची धादांत खोटी घोषणाही करून टाकली. कामगारांच्या यातनांवर भीषण चुप्पी साधलेल्या मोदीला उद्योगपतींना कोरोनाची 'संधी' सांगताना लाजही वाटत नाही.

### पोलिस, न्याययंत्रणा आणि मीडीयाची भुमिका

या सर्व काळामध्ये जणूकाही कोरोना आजार हा जनतेने केलेला गुन्हा आहे अशाप्रकारे गरिब कष्टकरी जनतेला यथेच्छ लाठ्या मारण्याचे स्वातंत्र्य पोलिसांनी प्रत्येक राज्यामध्ये घेतले.

पान 9 वर

# ‘पीएम केअर्स’ फंड: आणखी एक महाघोटाळा

✍ प्रसेन

सगळा देश कोरोना व्हायरस मुळे त्रस्त आहे. कोट्यवधी कष्टकरी परिवार भुकबळी होण्याच्या स्थितीला पोहोचले आहेत. देशामध्ये भुकेने अनेक मृत्यू झाले आहेत. सरकार आणि कारखाना मालकांनी हात वर केल्यावर सर्व औद्योगिक शहरांपासून शेकडो किलोमीटर चालत, भूक आणि पोलिसांचा जाच सहन करत, आपल्या मुलांच्या मृत्यूला डोळ्यादेखत पाहत जे मजूर आपल्या घरी पोहोचले, त्यांच्यासोबतच भुकेचा प्रश्नही पोहोचला आहे. जे मजूर मध्येच एखाद्या राज्याच्या सीमेवर रोखले गेले, त्यांना ठेवलेल्या कँपांची स्थिती अत्यंत खराब आहे. डॉक्टरांकडेही पुरेशा सुरक्षा कीट नाहीत. पण या सगळ्यामध्येच भाजपने कोरोनाशी लढण्याच्या नावाने एक मोठा खेळ खेळला आहे.

या नव्या खेळाचे नाव आहे ‘पीएम केअर्स’! असे म्हटले आहे की कोव्हिड-19 च्या साथीमुळे कोणत्याही आपात्कालीन किंवा संकटाच्या स्थितीशी मुकाबला करण्यासाठी ‘आपात्कालीन प्रधानमंत्री नागरिक सहायता आणि मदत निधी’ म्हणजेच थोडक्यात ‘पीएम केअर्स’ नावाचा फंड बनवण्यात आला आहे. अनेक लोकांना वाटू शकते की ‘पीएम केअर्स’ लोकांच्या ‘देखभाली’ साठी बनवला गेला आहे. पण याची संरचना, याला बनवण्याची प्रक्रिया आणि त्याच्या कार्यप्रणालीतून सुरुवातीपासूनच ‘बाळाचे पाय पाळण्यात’ दिसतात अशी प्रचिती येत आहे.

‘पीएम केअर्स’ ट्रस्टचे अध्यक्ष प्रधानमंत्री असतील आणि याच्या सदस्यांमध्ये विदेश मंत्री, गृह मंत्री आणि अर्थ मंत्री सामील आहेत. हा एक ट्रस्ट आहे ज्यामध्ये ‘प्रधानमंत्री’ शब्द वापरला गेला आहे. पण ही नावं फक्त भ्रम निर्माण करण्यासाठी आहेत. यामध्ये फक्त भाजपचे नेते आहेत. पदाधिकारी सरकारी नावाने आहेत, पण ट्रस्ट मध्ये ते ‘व्यक्तिगत’ नात्याने आहेत.

या ट्रस्टची निर्माण-प्रक्रिया सर्व नियम कायद्यांना धाब्यावर बसवून पुढे गेली आहे. पत्रकार नवनीत चतुर्वेदी यांनी ‘पीएम केअर्स’ फंडाच्या कागदपत्रांचा तपास करून पत्ता लावला की या फंडाला 27 मार्च रोजीच बनवले गेले होते. त्याच दिवशी याची ट्रस्ट-डीड रजिस्टर झाली होती. त्याच दिवशी याचा पॅन कार्ड नंबर सुद्धा घेतला गेला आणि त्याच दिवशी याला आयकर विभागाने 80(जी) कलमाअंतर्गत करातून सुटीचे प्रमाणपत्र सुद्धा दिले. म्हणजे नियम कायदे गेले खड्ड्यात! तसेही ‘लोकशाही’ मध्ये नियमांचा वापर हाच असतो की सरकार आणि भांडवलदारांच्या फायद्यासाठी जेव्हा वाटेल तेव्हा बनवावेत आणि वाटेल तेव्हा मोडीत काढावेत.

या ट्रस्टच्या कार्यपद्धती मध्ये इतके घोटाळे आहेत की ते याची पूर्ण पोलखोल करतात. यामध्ये पारदर्शकतेला कोणताही वाव नाही. ‘पीएम केअर्स’ फंडाचे ‘नियंत्रक आणि महालेखा परिक्षक’ (कॅग) द्वारे ऑडीट केले जाणार नाही, जे प्रत्येक सरकारी संस्थेला बंधनकारक असते. या फंडामध्ये मर्जीएवढे योगदान कोणीही देऊ शकतो. याबद्दल कोणतीही मर्यादा ठरवली गेलेली नाही. यामध्ये दिल्या जाणाऱ्या रकमेवर कलम 80(जी) अंतर्गत उत्पन्न करातून सूट दिली जाईल. नंतर अर्थ मंत्री निर्मला सितारामन आणि कॉर्पोरेट मंत्रालयाने हे सुद्धा स्पष्ट केले की जर कंपन्या पैसा देतील तर या रकमेला कंपन्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सी.एस.आर.) च्या मदतीमध्ये मोजले जाईल. मजेची गोष्ट अशी की कंपन्या आपल्या सी.एस. आर. निधीतून राज्यांच्या सरकारी संस्था असलेल्या ‘आपत्ती मदत निधी’ मध्ये दान देऊ शकत नाहीत. राज्य सरकारांना दान दिले तर कोणतीच सूट मिळणार नाही. म्हणजे पैसे द्यायचे असतील तर मोदीच्या झोळीत टाका, इतर कुठे नाही.

या फंडाच्या स्थापनेविरोधात ॲडव्होकेट एम.एल. शर्मा यांनी जनहित याचिका दाखल केली होती ज्यामध्ये त्यांनी म्हटले होते की सरकारने या फंडासाठी ना कोणता अध्यादेश काढला आणि ना कोणते गॅझेट नोटीफिकेशन काढले. याचिकेमध्ये या फंडामध्ये तोपर्यंत जमा झालेल्या दानाला सरकारच्या संयुक्त खात्यामध्ये टाकण्याची आणि न्यायालयाच्या निरीक्षणाखाली याची एस.आय.टी. चौकशी करण्याची मागणी केली गेली. अपेक्षेप्रमाणेच, सुप्रिम कोर्टाने पहिल्याच सुनावणीमध्ये याचिकेला रद्दबातल करून टाकले.

‘पीएम केअर्स’ बनताच याच्या साठी जोमाने वसुली सुरू झाली. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) च्या रेसिडेंट डॉक्टरांच्या संघटनेने एम्स व्यवस्थापनाकडून पीएम केअर्स फंडासाठी आपल्या कर्मचाऱ्यांचे एक दिवस वेतन कापण्याच्या निर्णयाचा विरोध केला. दिल्ली मध्ये फक्त एम्स नाही तर आर.एम.एल., लेडी हार्डींग, व्ही.एम.एम.सी., सफदरजंग आणि अटल बिहारी वाजपेयी इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायंस या हॉस्पिटलांच्या डॉक्टरांनी सुद्धा ‘पीएम केअर्स’ फंडामध्ये कोरोनाच्या नावाने होणारी वसुली देण्यास नकार दिला. त्यांनी म्हटले की ही रक्कम आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा कीट विकत घेण्यासाठी वापरली गेली पाहिजे. इतकेच नाही, तर या फंडाच्या वसुलीसाठी फसवेगिरीचा वापरही केला गेला. दिल्ली विद्यापीठाच्या शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन कापताना म्हटले गेले की ही रक्कम अगोदरच बनलेल्या ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधी’ मध्ये दिली जाईल. पण नंतर ही रक्कम मोदीच्या फंडामध्ये जमा केली गेली. अनेक सरकारी विभागांमध्ये नोटीस काढून एक-एक दिवसाचे वेतन कापून या फर्जी फंडामध्ये जमा केले जात आहे.

मोठा प्रश्न हा आहे की जेव्हा अगोदरच ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधी’ बनलेला आहे, तर नवीन फंड बनवण्याची गरज काय होती? प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीची स्थापना जानेवारी 1948 मध्ये जवाहरलाल नेहरुंच्या आवाहनावर जनतेच्या अंशदानातून केली गेली होती. प्रधानमंत्र्यांचे संयुक्त सचिव या कोषाचे सचिव असतात. तसेच संचालक स्तरावरचा एक अधिकारी त्यांची या कामामध्ये मदत करतो. प्रधानमंत्र्यांच्या निर्देशावरून ते या खात्याचे संचालन करतात. सन 2009-10 पासून ते 2018-19 पर्यंत या फंडामध्ये एकूण 4, 713 कोटी रुपये मिळाले होते, पण या दरम्यान यातील फक्त 2, 524 कोटीच खर्च होऊ शकले. यामध्ये आर्थिक वर्ष 2014-15 ते 2018-19 च्या दरम्यान कोषाला एकूण 3, 383 कोटी रुपये मिळाले ज्यापैकी या पाच वर्षांमध्ये फक्त 1, 593 कोटी रुपयेच खर्च झाले. या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच 3, 800 कोटी रुपये प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधी मध्ये होते. गेले वर्ष 3, 230 कोटी रुपयांनी सुरू झाले, 783 कोटी रुपये मिळाले आणि खर्च फक्त 212 कोटी झाला. पण हे 3, 800 कोटी आहेत कुठे? आता नवीन फंड बनवण्याची गरज का भासली? समजले आहे की 3, 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त बँकांच्या ‘परपेच्युअल बाँड’ (कायमस्वरुपी कर्जरोखे) इत्यादी मध्ये गुंतवले गेले आहेत, म्हणजे आता बँकांचे भांडवल बनले आहेत! बँकांचे जे भांडवल बुडाले आहे, त्याचा एक हिस्सा इथूनही आला आहे! आपल्या सहा वर्षांच्या काळात मोदींनी ओ.एन.जी.सी. पासून ते रिझर्व बँकेपर्यंत विविध संस्थांच्या संसाधनांना ज्याप्रकारे लुटले आहे, त्याच साखळीचा हा फंड सुद्धा एक हिस्सा आहे. आता भाजप कोरोनाच्या नावावर ‘पीएम केअर्स’ फंड बनवून अब्जावधी रुपये गोळा करत आहे, ज्याचा वापर पुन्हा एखाद्या राज्यामधल्या आमदारांना विकत घेण्यासाठी केला जाईल. कारण कोरोनाशी लढण्यामध्ये ‘पीएम केअर्स’ फंडाने काय योगदान दिले, याला ना आजपर्यंत कोणी जाणू शकले, आणि ना जाणू शकेल.

स्पष्ट आहे की ‘पीएम केअर्स’ जनतेला कोरोनापासून सुटका देण्यासाठी नाही बनलेला! उलट हा कर्मचारी आणि सामान्य जनतेला ठगण्यासाठी बनलेला आहे. मोठमोठ्या उद्योगपतींना तर टॅक्स मध्ये माफी मिळेल. इतकेच नाही, मोदीने जनतेच्या हितामध्ये खर्च करण्यासाठी दिले जाणारे धन, जसे की खासदार निधी मध्ये सुद्धा कपात करणे सुरू केले आहे. 70 खासदार आपल्या खासदार निधीमधून प्रत्येकी 1 कोटी रुपये ‘पीएम केअर्स’ ला देऊन चुकले आहेत. इतरांना सुद्धा देण्यासाठी सांगितले जात आहे. म्हणजे खासदारांनी आपल्या खिशाऐवजी जनतेच्या खिशातून काढून अशा फंडामध्ये पैसे गुंतवले आहेत ज्याचा हिशोब मागणे शक्य नाही. खरेतर, हा एक मोठा घोटाळा आहे. भाजप आणि संघ परिवार या पैशाला आपल्या फॅसिस्ट अजेंड्याला अजून वेगाने लागू करण्यासाठी वापरतील. कोरोनासारखी महामारी सुद्धा भाजप सारख्या फॅसिस्ट पक्षांसाठी आपल्या काळ्या कारनाम्यांना पुढे नेण्याची एक संधी आहे. आपण ‘पीएम केअर्स’ फंडाच्या पारदर्शकतेची मागणी जोरदारपणे उचलली पाहिजे आणि लक्षात ठेवले पाहिजे की सध्याच्या भांडवली व्यवस्थेपेक्षा कोणतीही महामारी मोठी नाही. या व्यवस्थेला ध्वस्त करूनच प्रत्येक प्रकारच्या महामारीपासून वाचणे शक्य आहे.

**अनुवाद: परमेश्वर**

# भांडवली व्यवस्था नष्ट केल्याशिवाय कामगार वर्गाला न्याय मिळणे शक्य नाही!

पान 8 वरुन

पोलिसांनी मारल्यामुळे मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. देशातील कोट्यवधी गरिब कष्टकरी-कामगार जनता यातना भोगत असताना सर्वोच्च न्यायालयाचे प्राधान्य मात्र कधीही सर्वांना तात्काळ रेशन, प्रवासाची, सुरक्षेची, आरोग्याची सोय मिळावी याला दिसले नाही; उलट कोरोनाची चाचणी मोफत करण्याचा निर्णय कोर्टाने फिरवला आणि खाजगी हॉस्पिटलांच्या नफेखोरीला रोखण्यासाठी सुद्धा काहीच केले नाही. या सर्वांच्या वर भांडवलदार वर्गाने चालवलेल्या जवळपास सर्वच टीव्ही चॅनेल्स वर बहुसंख्य वेळ कोट्यवधी कामगारांच्या हाल अपेष्टा न दाखवता पाकिस्तान, हिंदु-मुस्लिम जातीय प्रश्न, दिल्ली दंगलींमधले खोटे आरोप, यावरच चर्चा घडवल्या गेल्या. कोरोनाच्या संकटावर सुद्धा वस्तुनिष्ठ बातम्या न देता या चॅनेल्सनी फक्त मोदी सरकारचे कोडकौतुक करण्यात अनेक तास खर्च केले. स्पष्ट आहे की या सर्व यंत्रणांनी मेहनत करून देश चालवणाऱ्या कामगार वर्गाप्रती त्यांची काहीही बांधिलकी नाहीये हे दाखवून दिले आहे.

**अगोदर जाऊ नये म्हणून दबाव, प्रयत्न; आता परत कामावर या म्हणून विनवण्या**

कामगारांनी शहरे सोडून आपापल्या मूळ गावी जावी नये म्हणून ठेकेदार, मालक आणि सरकारांनी मिळून कसून प्रयत्न केले. अगोदर तर प्रवास बंदी केली. कामगार पायी जाऊ लागले तर त्यांना सीमेवर अडवले. शेवटी देशभरातून रेटा वाढला तेव्हा रेल्वे सोडल्या गेल्या, पण त्याचेही भाडे वसूल केले. आता मात्र कामगारांनी पुन्हा परत यावे यासाठी अनेक ठिकाणी मालक ए.सी. बस पाठवत आहेत, अगदी विमानाचे तिकीटही दिले जात आहे. जेव्हा भुकेने कामगार मरत होते, तेव्हा गायब झालेले हे मालक आता सक्रीय कसे झाले?

उत्तर सोपे आहे आणि या उत्तरातच ज्या व्यवस्थेत आपण जगतो तिचे खरे ‘गुपित’ आहे. ते ‘गुपित’ असे आहे की संपूर्ण अर्थव्यवस्था, कारखाने, उद्योगधंदे, बांधकामापासून ते बस-रेल्वे सारख्या वाहतूकी पर्यंत प्रत्येक उद्योग हा कामगारांमुळेच चालतो, मालकांमुळे नाही. जर कामगारांनी संघटीतपणे कामच केले नाही तर मालकांकडे असलेले भांडवल, हत्यारे, कारखाने, जमीन काहीच कामाची नाही! जोपर्यंत कामगाराचा हात लागत नाही, तोपर्यंत ही सगळी भांडवलरुपी उत्पादनाची साधनं बिनकामी आहेत! तेव्हा या दुनियेचे खरे चालक आपण कामगार आहोत हे वास्तव या संकटाने पुन्हा एकदा समोर आणले आहे.

**भांडवलशाही न्याय देऊ शकत नाही!**

गेल्या चार महिन्यांच्या अनुभवाने फक्त हेच सिद्ध केलेले नाही की सरकार, पोलिस, न्यायंत्रणा, मीडीया हे सर्व प्रभावीरित्या मालक, भांडवलदार, ठेकेदार वर्गाच्याच सेवेत रमलेले आहेत, तर हे सुद्धा दाखवून दिले आहे की कामगारच या दुनियेची चालक शक्ती आहेत. बहुसंख्यांक असलेल्या, शंभरपैकी ऐंशीच्या वर संख्या असलेल्या कामगार-अर्धकामगार-कष्टकरी वर्गाला न्याय देण्यास ही व्यवस्था नालायक आहे हेच सिद्ध झाले आहे. भांडवलावर, उत्पादनाच्या साधनांवर, शेतं, कारखाने, रस्ते, वीज, दळणवळणाची साधने, खाणी अशा सर्व उत्पादनाच्या साधनांवर भांडवलदाराची मालकी आहे आणि म्हणूनच देशातील राज्यसत्तेची यंत्रणा आज त्यांच्या सेवेत लागली आहेत आणि कामगार वर्गाचे रक्त पिऊन जगत आहेत. म्हणूनच फक्त कोरोना संकटावर मात करण्यासाठी नाही तर खऱ्या अर्थाने न्याय मिळावा यासाठी कामगार वर्गाने संघटीत होऊन शहीद भगतसिंहाच्या स्वप्नातील क्रांतिकारी परिवर्तनासाठी सज्ज झाले पाहिजे, एक अशा समाजाच्या निर्मितीसाठी जेथे उत्पादन साधनांवर, समाजाच्या अधिरचनेवर मुठभर भांडवलदारांचा नाही तर बहुसंख्यांक कामगार वर्गाचा ताबा असेल!

# कोरोनाच्या काळात अफवा आणि अंधश्रद्धांचा सुळसुळाट!

## मूर्खपणाची स्पर्धा बंद करा! विज्ञानाची कास धरा!

✍ पवन

भारतीय समाजातील अंधश्रद्धा पुन्हा एकदा कोरोनाच्या निमित्ताने बोकाळून आल्या आहेत. सर्वधर्मीय बाबा-बुवांनी लाज आणेल अशाप्रकारे कोरोनाला संपवणाऱ्या औषधी आणि उपाययोजना शोधल्या आहेत आणि व्हॉट्सअप वरचे योद्धे या अंधश्रद्धांना जीवापाड मेहनत करून जनतेपर्यंत पोहोचवत आहेत. माझा धर्म मोठा की तुझा या साठमारीमध्ये, आणि धार्मिक-जातीय वर्चस्वाच्या विचारांनी ग्रासलेल्या समाजामध्ये कोरोना सारख्या साथीला प्रतिबंध करणे अजून अवघड काम बनवले आहे.

उत्तर प्रदेश मध्ये लखीमपूर मध्ये एका पंडिताने सांगितले की विहिरीमध्ये पाणी भरल्यानंतर कोरोना निघून जाईल. लखनऊ मध्ये एक कोरोना बाबा नावाचा बाबा आहे जो तावीज बांधल्यानंतर कोरोना लागण तुम्हाला होणार नाही असा भ्रम पसरवत आहे. कुठून तरी व्हाट्सअप वरून मेसेज आला आणि भाटापारा या गावांमध्ये नंदी ला पाणी पाजण्याचा प्रकार सुरू झाला, तर काही ठिकाणी गोमूत्र पिल्याने आणि शेणाचा लेप लावल्याने त्याचा आजार तुम्हाला होणार नाही असे सांगणारे संदेश व्हॉट्सअप वर फिरत आहेत. याचाच एक परिणाम म्हणजे बंगालमध्ये जोर बागवान या ठिकाणी एका भाजप कार्यकर्त्याने शिपायाला जबरदस्ती गोमूत्र पाजले, ज्यामुळे तो आजारी पडला आणि या कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल झाला आहे. बुंदेलखंड मध्ये घरातील दारात भांडे ठेवून भांड्याला शेण लावल्याने तुमच्या घरांचे रक्षण देवी करेल आणि तुम्हाला तुमच्या घरामध्ये कोरोनाची लागण होणार नाही असा प्रचार झाला. तर राजस्थानमध्ये दोहोरी जिल्ह्यांमध्ये लोक एकत्र येऊन कोणत्यातरी बाबाची पूजा करत आहेत.

ज्या देशामध्ये रामदास आठवले सारखे मंत्री 'गो कोरोना' चा नारा देतात तिथे इतरांकडून काय अपेक्षा करावी? मोदींनी स्वतःच्या सरकारचे नाकर्तेपण लपवायला जनतेला टाळ्या-थाळ्या वाजवायला आणि दिवे लावायला सांगितले, तर देशातील महान भक्त मंडळींनी थाळ्या वाजवून कोरोना मरतो आणि दिवे लावून सुद्धा मरतो असा प्रचार चालू केला. इथेच थांबले नाहीत तर शेकडो लोकांनी लॉकडाऊन धाब्यावर बसवून एकत्र येत मोठमोठ्या रॅली काढल्या आणि 'गो कोरोना'च्या घोषणा दिल्या, ज्याचे शेकडो व्हिडिओ युट्युबवर उपलब्ध आहेत. कोरोनाच्या निमित्ताने लोकांच्या धर्मश्रद्धाळू स्थितीचा आणि खोट्या राष्ट्रवादाच्या लहरीचा फायदा घेत, आयुर्वेदाच्या शास्त्राला फाट्यावर मारत, बाबा रामदेव या उद्योगपतीने तर कोरोनावर शंभर टक्के उपाय शोधल्याचा पूर्णपणे खोटा दावा करत औषधही बाजारात आणले!

सर्व जगामध्ये शारीरिक अंतर ठेवण्याचा प्रयत्न चालू असताना, तिकडे सर्व धर्माच्या लोकांमध्ये जणू स्पर्धाच लागली आहे की आमच्या धर्माची शक्ती कोरोनाला थांबवू शकते. दिल्लीमध्ये मरकज मध्ये जमलेल्या तबलीघी मुस्लिम धर्मप्रचारकांच्या बावळटपणामुळे रोग अजून पसरला. त्यांचे नेते मौलाना साद हे धार्मिक मूर्खपणाचे अपवाद नाहीत तर नियम आहेत असे म्हणावे लागेल. इतर धर्मांनी बहुतेक आपल्या धर्माचे 'देव' कसे जास्त शक्तीशाली आहेत हे सांगण्यात आणि बावळटपणाच्या स्पर्धेमध्ये अजिबात कसर सोडलेली नाही. एप्रिल महिन्यात रामनवमी साजरी करण्यासाठी पश्चिम बंगाल मध्ये शेकडो लोक एकत्र जमले. कर्नाटकात कोळगोड्डहळ्ळी या गावात हजारो लोक धार्मिक जत्रेसाठी जमले. याला गावाच्या पंचायतीने परवानगी सुद्धा दिली! 11 मे रोजी मध्यप्रदेशामध्ये मुनी प्रणाम सागर या जैन साधूंच्या स्वागतासाठी सागर जिल्ह्यामध्ये शेकडो लोक एकत्र आले. भारतातच हे होत आहे असे नाही. लंडनमध्ये स्टॅम्फर्ड हिल येथे हासिदिक ज्यू समुदायाचे अनेक लोक 14 मे रोजी एकत्र जमले आणि आपला सण साजरा केला. जगभरामध्ये इतरही अनेक उदाहरणे आहेत, पण अशा अंधश्रद्धांच्या बाबतीत भारत विरळाच म्हणावा लागेल!

**वैज्ञानिक तथ्य**

नोव्हेल कोरोना व्हायरस हा एक नवीन व्हायरस असून यावर कोणतेही औषध किंवा लस अजून विकसित झालेली नाही. अनेक जण याला विज्ञानाचे 'अपयश' म्हणून संबोधताना दिसतात आणि म्हणूनच 'दैवी' उपचारांचा मार्ग सांगताना दिसतात. खरेतर विज्ञान कधीही शंभर टक्के सत्य किंवा सर्व उत्तरे माहित असल्याचा दावा करत नाही. विविध देशांमध्ये शास्त्रज्ञ, डॉक्टर्स मिळून औषध आणि लस शोधत आहेत, परंतु अशाप्रकारच्या वैज्ञानिक शोधाला किती वेळ लागेल किंवा नक्की यश मिळेलच याची खात्री कधीच नसते. गोवर, देवी, पोलिओ सारख्या अनेक आजारांवर विज्ञानाने लस शोधली आणि कोट्यवधी लोकांचे जीव वाचले. परंतु एड्स सारख्या रोगावर संशोधन चालूच आहे. विज्ञान म्हणजे जादू नाही, तर मानवी प्रयत्न आणि वैज्ञानिक पद्धत यांचा परिणाम आहे. आजपर्यंत सर्व रोगांवर फक्त विज्ञानानेच औषध शोधले आहे आणि त्यामुळे विज्ञानाचा जास्तीत जास्त प्रसार-प्रचार-वापर-शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. औषध मिळणे वा ना मिळणे यातून विज्ञानाचे यश वा अपयश सिद्ध होत नाही. परंतु उपाय मिळण्याचा वैज्ञानिक पद्धत हाच एकमेव मार्ग आहे.

कोरोनावर औषध नसले, तरी इतर अनेक आजारांप्रमाणे आपापल्या शरीराच्या रोग प्रतिकारक शक्तीप्रमाणे अनेक लोक बरे होत आहेत. तरीही सध्या कोरोना पासून वाचण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे त्याचा संसर्ग होऊ न देणे. त्यासाठी पहिले म्हणजे स्वतःची स्वच्छता ठेवणे, सॅनिटायझर किंवा साबणाने हात सतत स्वच्छ करणे, मास्क लावणे, घरामध्ये किंवा बाहेरील संपर्कात येणाऱ्या व्यक्ती पासून शरीरापासून किमान एक मीटरचे अंतर ठेवणे, या गोष्टी महत्वाच्या ठरतात दुसरे म्हणजे कोणतीही लक्षणे आजाराची लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांना संपर्क साधणे व त्याच्यावर योग्य तो उपचार घेणे आणि कोणत्याही धार्मिक दुष्ट प्रचाराला आणि अंधविश्वासाला बळी न पडणे. भारतासारख्या प्रचंड गरिबी असलेल्या देशात हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा सरकार रिकामी घरं ताब्यात घेणे, मोठमोठी हॉटेल्स आणि पंचतारांकित हॉस्पिटल ताब्यात घेणे आणि जनतेला उपलब्ध करून देणे, वैद्यकीय सेवेचे राष्ट्रीयीकरण, यासारखी क्रांतिकारी पावले उचलेल. तेव्हा जनपक्षधर वैज्ञानिक दृष्टीकोण फक्त औषधासाठीच नाही, तर सामाजिक-आर्थिक बाबींमध्येही आवश्यक आहे. अंधश्रद्धा, धार्मिक अपप्रचार याला बळी न पडता, डॉक्टर आणि वैज्ञानिक समुदायाकडून दिल्या जाणाऱ्या सुचनांचे पालन हाच एकमेव मार्ग अवलंबिण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न आपण केला पाहिजे, आणि वैज्ञानिक मार्गानेच रोगाला तोंड देण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करवण्यासाठी भांडवली राज्यसत्तेसोबत सुद्धा संघर्ष केला पाहिजे.

# आरोग्याच्या धंद्याच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याची जीवघेणी स्पर्धा!

**पान 1 वरून**

एका 29 वर्षीय युवकाच्या आईचा उपचार केईम नावाच्या एका खाजगी रुग्णालयाने संपूर्ण खर्च भरेपर्यंत स्थगित करून ठेवला कारण विमा कंपनीने भरावयाच्या रकमेमधून म्हणजे 1.05 लाखाच्या बिलामधून 60, 000 रुपयेच देऊ करत हात वर केलेत. टाळेबंदीमुळे व्यवसाय सुरू नसल्याने रक्कम भरण्यास असमर्थ असलेल्या युवकाने तक्रार दाखल केल्यानंतर देखील प्रशासनाकडून काही पाऊले उचलली गेली नाहीत. मॅक्स हेल्थकेअर हॉस्पिटलने तर कोरोनाच्या इलाजासाठी असे दर जाहीर केले आहेत: जनरल वार्ड साठी प्रति दिन रु. 25, 090 रु., आयसोलेशन सहित जनरल वार्ड साठी प्रति दिन रु. 30, 490 रु., व्हेंटीलेटर शिवाय आय.सी.यू. साठी प्रतिदिन 53, 050 रु., व्हेंटीलेटर सहित आय.सी.यू. साठी 72, 555 रु. प्रति दिन ; याशिवाय पी.पी.ई. चे प्रति दिन 3900 ते 7900 रु., आणि विविध चाचण्यांचे अशाच प्रकारे अनेक हजार रुपये! पी.पी.ई. किटचे बिल सुद्धा पेशंट कडून वसूल केले जात आहे. प्रत्येक पेशंटला प्रत्येक पीपीई किटचे बिल लावून (जेव्हा की एक डॉक्टर एक पी.पी.ई. किट घालून अनेक पेशंट पहात असतात) हॉस्पिटल्स तगडी कमाई करत आहेत. काही उदाहरणे पाहूयात: मुंबईमध्ये एका पेशंतला 2.8 लाखांचे बिल दिले गेले ज्यामध्ये 1.4 लाखांचे बिल फक्त पी.पी.ई. किट्स चे होते. दिल्लीमध्ये एका हॉस्पिटलने 9 दिवसांच्या इलाजामध्ये 80, 000 रुपयांचे फक्त पी.पी.ई. किटचे बिल लावले. दिल्लीमध्ये अनेक हॉस्पिटल तर अॅडमिशन घेतानाच 5 लाख रुपयांपर्यंत रक्कमस डिपॉझिट करायला सांगत आहेत. हॉस्पिटलचे बिल भरायला अनेकांना कर्ज काढावे लागले आहे. ही परिस्थिती जगभरामध्ये आहे. अमेरिकेत तर काही पेशंटना 10 लाख डॉलर्स (7 कोटी रुपये) पेक्षा जास्त बिल देण्यात आले आहे!

कोरोनाच्या चाचण्या करणाऱ्या खाजगी 'कंपन्या' रूपी लॅब सुद्धा मागे राहिलेल्या नाहीत. ठाण्यामध्येच थायरोकेयर या खाजगी पॅथोलॉजी लॅबने अनेक पेशंटचे कोरोनाची चाचणी निगेटीव्ह असताना सुद्धा त्यांचे अहवाल पॉझिटिव्ह आहेत असे सांगितले. अशाच प्रकारे नॉयडा, दिल्ली येथे सुद्धा एका खाजगी लॅबने अशाच प्रकारे अहवाल दिल्याचे दिसून आले आहे. यामुळे अनेक लोकांना विनाकारण हॉस्पिटल मध्ये भरती व्हावे लागले आणि हजारो-लाखोंचा खर्च करावा लागला. लॅब आणि हॉस्पिटल्स मध्ये संगनमत असल्याचे आता आरोप केले जात आहेत.

न्यूयॉर्क टाईम्स च्या एका बातमी नुसार ह्या संपूर्ण भीतीच्या बाजारात ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून अनेक घोटाळे करण्यात आलेत, ज्यात खोटी लस, खोटी औषधे, निकामी मास्क्स्, ग्लोव्ह्स् यांचा समावेश होता. इटली, फ्रान्स आणि स्पेन सारख्या कोरोनाने अत्याधिक थैमान घातलेल्या देशांत बनावटी फेस मास्क्स्, विषाणू परिक्षण चाचण्या, लॅटेक्स हँड ग्लोव्हस्, सॅनिटायझर्स, डीसइनफेक्टंट्स् अँटिव्हायरल औषधे विकून प्रचंड मोठ्या प्रमाणावर नफा कमविण्यात येत आहेत आणि ह्या मुख्यत्वे चिनी आणि भारतीय कंपनी आहेत. युरोपिअन मेडिसिन एजन्सी ने क्लोरोक्वीन नावाचे औषध फक्त आपात्कालीन परिस्थितीत वापरण्याचे आदेश दिल्यानंतर देखील डार्क बे, बीट बझ्झार, येलो ब्रिक सारख्या ऑनलाईन पोर्टल्स द्वारे औषध अवैधरित्या विकण्यात येत आहे. विविध औषध कंपन्यांचे हित जपण्यासाठी अजून सिद्ध न झालेल्या औषधांचा प्रचार प्रसार करण्यात विविध देशांमधील सरकारे मागे राहिली नाहीत. मोदीचे परममित्र असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रपती ट्रम्पने अँटीसेप्टिक द्रव्य पिणे, हायड्रोक्लोरोक्वीन सारख्या मलेरियाच्या उपचारात वापरण्यात येणाऱ्या गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेण्यास सांगितल्या.

कोरोनाचा 'लाभ' उचलत 'देशभक्त' सरकारांनी सुद्धा नफेखोरी आणि लाचखोरीचा अलभ्य लाभ उचलला आहे. 'आत्मनिर्भर व्हा' म्हणून घसा फाडणाऱ्या मोदी सरकारच्या हिमाचल भाजपा अध्यक्ष बिंदलला पीपीई किट्स साठी लाच घेतांना पकडल्याने राजीनामा द्यावा लागला. 'उंदराला मांजर साक्ष' अशी ह्या भांडवलदार आणि सरकार बनवणाऱ्या नेत्यांची गत आहे. हिंदुत्ववादी आणि ढोंगी राष्ट्रवादी बाबा रामदेवने तर कोरोनावर 100 टक्के इलाज करणाऱ्या 'कोरोनील' या औषधाची धादांत खोटी जाहिरात करून हजारो कोटी कमावण्याचे षडयंत्र रचले आहे, आणि दुसरीकडे आयुर्वेदासारख्या हजारो वर्षे जुन्या उपचार पद्धतीला गालबोट लावले आहे.

मालकांच्या सेवेत नखशिखान्त बुडून राहणारे केंद्र आणि राज्य सरकार टाळेबंदीच्या काळात इतर महत्वाच्या सुविधांची दुकानं बंद असतांना दारूची दुकानं सुरु करण्याचा 'शहाणपणा' मात्र नक्की करते आणि दारू बनवणाऱ्या कंपन्यांच्या नफेखोरीला सहाय्य करते. सरकारच्या असल्या सर्व मूर्ख पाऊलांवर टाळ्या पिटणाऱ्या, विदेशस्थित काही मध्यमवर्गीय भारतीयांचे डोळे खाडकन् उघडलेत जेव्हा 64 विमाने परदेशी पाठविण्याची योजना समोर आली. ह्या योजनेनुसार सर्वांनाच परत आणणे शक्य नसल्याने 50 हजार ते 2 लाखपर्यंतचा पास ठेवण्यात आला. पैसे जमवू न शकलेल्यांना तिथेच मरण्यासाठी सोडण्यात आले. इतकंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय खनिज तेलाच्या किमतीत ऐतिहासिकरित्या घसरण झाली असून देखील उद्योगपतींच्या झोळ्या भरण्यासाठी जनतेची लूट करण्यास सदैव तत्पर असणाऱ्या सरकारने पेट्रोल-डिझेलच्या किमती पूर्वीपेक्षा अधिक वाढवल्यात. 28 रुपये लिटर पेट्रोल आणि 32 रुपये लिटर डिझेल जिथे किंमत असायला हवी तिथे कोरोनाच्या काळात किंमती अधिक वाढवण्यात आल्या. प्रचंड मोठा गाजा वाजा करत सुरू करण्यात आलेल्या श्रमिक ट्रेन चे देखील घोटाळे समोर आलेत. संपूर्ण प्रवास खर्च मात्र 80 रुपये म्हणून जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणाऱ्या सरकारने प्रवाश्यांकडून तिकिटाचे संपूर्ण पैसे घेतलेत. याशिवाय त्यांना घरी परतण्याची परवानगी मिळवण्याचा अर्ज

**पान 11 वर**

# कोरोनाच्या साथीच्या आणि लॉकडाऊनच्या आडून एन.आर.सी., एन.पी.आर., सी.ए.ए. विरोधी चळवळीतील कार्यकर्त्यांचे फॅसिस्ट राज्यसत्तेकडून दमन!

✍ अभिजित

कोरोना साथीमुळे लॉकडाऊन जाहीर केलेला असताना, लॉकडाऊनच्या आडून फॅसिस्ट मोदी सरकारने एन.आर.सी. (नॅशनलर रजिस्टर ऑफ सिटीझन्स, राष्ट्रीय नागरिकता नोंदवही), एन.पी.आर. (नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर) आणि सी.ए.ए. (सिटीझनशीप अमेंडमेंट ॲक्ट, नागरिकता सुधार कायदा 2019) च्या विरोधातील कार्यकर्त्यांना निशाणा करुन, दिल्ली मध्ये झालेल्या दंगलींच्या आरोपावरुन दमनसत्र चालवले आहे. आपल्या विरोधातील प्रत्येक आवाज दाबून टाकत, लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या फॅसिस्ट मोदी सरकारचा पक्षपातीपणा सरळ दिसून येत आहे.

कोरोना साथीच्या अगोदर भारतामध्ये एन.आर. सी., एन.पी.आर., सी.ए.ए. कायद्याविरोधात मोठा जनसंघर्ष उभा राहिला होता. धर्माच्या आधारावर नागरिकत्व ठरवू पाहणाऱ्या आणि देशातील प्रत्येक व्यक्तीला कागदोपत्री पुरावे मागून नागरिकत्व सिद्ध करण्यास सांगणाऱ्या या कायद्यांविरोधात देशातील सर्व धर्मीय जनता मोठ्या निकराने संघर्ष करत होती. या संघर्षाने मोदी-शहा यांच्या फॅसिस्ट राजवटीला नाकी नऊ नक्कीच आणले होते. सर्वत्र दमन तंत्राचा वापर करून हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न मोदी सरकार करतच होते. अशातच कोरोनाच्या साथीमध्ये प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून टाळेबंदी केल्यावर या चळवळीतील कार्यकर्त्यांना हेरून निशाणा बनवण्याचे आणि दमनाचे काम मोदी-शहा सरकारने वेगाने पुढे नेले आहे.

दिल्ली आणि देशभरामध्ये जवळपास अडीच महिने एन.आर.सी., एन.पी.आर., सी.ए.ए. विरोधातील आंदोलन जवळपास सर्वत्र शांततामय मार्गाने चालले. परंतु दिल्ली मध्ये फेब्रुवारी महिन्यात सुनियोजित पद्धतीने धार्मिक दंगली घडवल्या गेल्या. या दंगलींमध्ये पोलिस आणि आर.एस.एस., भाजप च्या कार्यकर्त्यांच्या आणि नेत्यांच्या सहभागाबद्दल अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत आणि पुष्टी करणारे अनेक व्हिडीओ सुद्धा समोर आले आहेत. दंगलींमध्ये 55 लोक मारले गेले. यावर पोलिसांनी दोन एफ.आय.आर. (क्र. 59/20 आणि 49/20) दाखल केले आहेत. याच एफ.आय.आर. च्या आधारावर दिल्लीमध्ये पोलिसांनी जवळपास 800 कार्यकर्त्यांना मनमानी पद्धतीने ताब्यात घेतले आहे, किंवा अटक केली आहे, आणि अनेकांना वेगवेगळी कलमे लावून न्यायालयीन कोठडीत पोहोचवले आहे. धरपकड केलेले बहुसंख्य कार्यकर्ते हे फक्त एन.आर. सी. विरोधी चळवळीतीलच आहेत, समर्थकांवर कारवाई अजिबात झालेली नाही. या सर्व कारवाया कोरोना साथीच्या अशा काळात केल्या जात आहेत, ज्या काळात एकीकडे सरकार शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना तुरुंगातून सोडत आहे तर दुसरीकडे वकिली मदत किंवा न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे अत्यंत बिकट झालेले आहे, जनतेचे बहुसंख्य लोकशाही आणि नागरी अधिकार कर्फ्यू मुळे निलंबित आहेत! स्पष्ट आहे की कारवाई होत असलेल्या व्यक्तींना त्यांचे कायदेशीर अधिकार वापरता येऊ नयेत हे यामागचे उद्दिष्ट नक्की आहे!

अनेक विद्यार्थी, युवक संघटनांच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना अटक करण्यात आली आहे. उदा: जामिया मिलिया विद्यापीठातील 25 वर्षांय विद्यार्थी गल्फिशा यांना सीलमपूर येथे 9 एप्रिल रोजी अटक करण्यात आली. जामिया विद्यापीठातील विद्यार्थिनी सफूरा जरगर यांना त्या स्वत: गरोदर असताना अटक करण्यात आली, जे स्पष्टपणे सर्व मानवी अधिकारांना धाब्यावर बसवून केलेले काम आहे. त्या सीएए विरोधी विरोधातील समन्वय समितीच्या प्रसिद्धीप्रमुख म्हणून काम करत होत्या. याशिवाय इशरत जहाँ, खालीद सैफी, मीरन हैदर, गुल्फिसा, ताहीर हुसैन, अशा अनेकांना चौकशीसाठी स्थानबद्ध केले गेले होते. योगेश स्वामी, हे नौजवान भारत सभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, तसेच विशाल जे कोरोना साथीच्या काळात सतत प्रवासी मजुरांना अन्नधान्याची मदत पोहोचवण्यामध्ये सक्रिय सहभागी होते आणि दंगलीच्या अगोदर संपूर्ण दिल्लीमध्ये फिरून शांतता ठेवण्याचे काम 'सत्याग्रह पदयात्रे' द्वारे करत होते, त्यांनाही चौकशीसाठी स्थानबद्ध केले गेले. इतकेच नाही तर इतकेच नाही तर नौजवान भारत सभेच्या अधिकृत वेबसाईटवर (भगतसिंग आणि त्यांच्या साथीदाराच्या विचाराचा प्रसार आणि प्रचार करणारे साहित्य या वेबसाईटवर उपलब्ध आहे) कोणतीही नोटीस सुद्धा न देता सरळ दिल्ली पोलिसांनी बंदी घातली आहे. यापैकी बहुसंख्य कार्यकर्त्यांना कायदेशीर प्रक्रिया धाब्यावर बसवून, कोणतीही नोटीस न देता, पूर्वसुचना न देता, सरळ त्यांच्या राहत्या जागांवरून पोलिसांनी उचलले आणि चौकशीसाठी नेले. सामाजिक दबाव बनणे चालू झाल्यावर आणि लॉकडाऊनच्या अडचणींनंतरही वकिली मदत कशीबशी मिळवण्यात आल्यावरच, अनेकांना चौकशीच्या नोटीसा देण्यात आल्या.

तसेच जेएनयूचे माजी विद्यार्थी उमर खालीद, जामिया मिलिया विद्यापीठाची विद्यार्थीनी सफूरा जरगर आणि जामियाचेच पीएचडी विद्यार्थी आणि राष्ट्रीय जनता दलाचे दिल्ली राज्याध्यक्ष मीरन हैदर, जामियाचे विद्यार्थी शफी उर रेहमान यांच्यावर यू.ए.पी.ए. सारख्या काळ्या कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. यू.ए.पी.ए. त्या काळ्या कायद्यांपैकी एक आहे जे ब्रिटीश सरकारच्या काळ्या कायद्यांप्रमाणे सरकारला मनमानी पद्धतीने कोणत्याही व्यक्तीला फक्त संशयावरुन अमर्याद काळ अटकेत ठेवण्याचे अधिकार देतात. यू.ए.पी.ए. सारखे काळे कायदे रद्द झाले पाहिजेत या मागणीसाठी दीर्घ काळापासून नागरिक चळवळ सुरु आहे.

दिल्ली पोलिसांच्या मते तपास आणि अटका न्याय्य आहेत आणि पुराव्यांच्या आधारावर केल्या जात आहेत. जर असे आहे, तर दिल्ली पोलिस अशा पुराव्यांना नागरिकांसमोर का आणत नाहीये? पोलिसांच्या मते रस्ता अडवल्यामुळे दंगलीं झाल्या, परंतु फक्त रस्ता अडवल्यामुळे दंगली कशा होऊ शकतात? आंदोलन तर दोन महिन्यांपासून सुरू होते, मग अचानक दंगली कशा झाल्या? दंगलीमध्ये एकाच समुदायाचे लोक सामील होते का? या प्रश्नांवर दिल्ली पोलिस मौन आहेत. त्याचे कारणही स्पष्ट आहे - भाजप सरकारचा जातीयवादी अजेंडा.

दंगली भडकावण्यामध्ये गोदी मीडीया आणि भाजपच्या नेत्यांचा सहभाग स्पष्टपणे दिसून येतो. भाजप नेते कपिल मिश्रा यांनी 23 फेब्रुवारीला भडकाऊ भाषण केल्यानंतरच दंगली कशा झाल्या? अनुराग ठाकुर, प्रवेश वर्मा, कपिल मिश्रा, रागिणी तिवारी, अभय वर्मा यासारख्या भाजप नेत्यांचे भाषणांचे व्हिडीओ युट्युबवर आजही उपलब्ध आहेत. यांच्या भाषणांनंतरच दंगली का भडकल्या, या प्रश्नांना अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न हे सरकार नक्कीच करत आहे. खरेतर कपिल मिश्रांचे भडकाऊ भाषण दिल्लीच्या पोलिस अधिकाऱ्यांसमोर दिले गेले आणि कपिल मिश्रांच्या वक्तव्याला पोलिसांनी आक्षेपही घेतला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा त्याच्याशी संलग्न असणाऱ्या अनेक संघटनांच्या कार्यकर्त्यांचे दिल्लीत दंगली घडवण्यात सहभाग असलेचे व्हिडिओ आणि फोटो सार्वजनिक रित्या प्रसिद्ध झाल्यावर सुद्धा पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी का बोलावलेले नाही? किंवा त्यांना ताब्यात का घेतले गेले नाही? याच काळामध्ये लोकांना भडकावणारी भाषणे दिल्याबद्दल भाजप नेत्यांवर एफ.आय. आर. दाखल करण्याचा आदेश देणारे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मुरलीधर यांची बदली का केली गेली? या घटनाक्रमातच सरकारचा आकस स्पष्टपणे दिसून येतो.

दंगलीमध्ये सामील व्यक्ती, मग त्या कोणत्याही धर्माच्या असोत किंवा पक्षाच्या, त्यांच्यावर कायद्याद्वारे आणि पुराव्यांच्या आधारावर कारवाई झालीच पाहिजे, परंतु मोदी-शाह सरकारचा इरादा स्पष्टपणे फक्त एन.आर.सी., सी.ए.ए., एन.पी.आर. विरोधकांना निशाणा बनवण्याचा, बदल्याच्या भावनेने कारवाई करण्याचा आणि संघी-भाजपाई लोकांना वाचवण्याचा आहे हे स्पष्ट आहे.

# आरोग्याच्या धंद्याच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याची जीवघेणी स्पर्धा!

पान 10 वरून

भरण्यापासून ते घरी पोहचण्यापर्यंतच्या प्रक्रियेत पोलिसांनी भरमसाठ पैसे खाल्लेत. भाजीपाला आणि किराण्यापासून सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती दुपटी-तिपटीने वाढल्या असून कामगार-कष्टकरी वर्गाला सरकारने मरणाचे द्वार खुले केले आहे.

याच नफेखोरीचा एक दीर्घकालीक परिणाम आहे की अशा प्रकारच्या आजारांवर लवकर औषध मिळणे दुरापास्त झाले आहे. कुठल्याही साथीच्या आजाराच्या काळात सॅनिटायझर्स, मास्कस्, औषधे लोकांच्या गरजेसाठी उत्पादित केली जायला हवीत, नफा कमविण्यासाठी नव्हे, परंतु सर्वच फार्मा कंपनींची नफा कमविण्याची एक क्रूर शर्यत सुरू असून संपूर्ण आरोग्यव्यवस्थेला तिने गिळंकृत करून आतून पोकळ, निरुपयोगी बनवले आहे. कोरोनासारख्या 'फ्लू' च्या गटामध्ये गणल्या जाणाऱ्या आजारांवर आजतागायत लस किंवा औषध शोधले गेले नाही कारण त्यासाठी संशोधन केले जात नाही. इलाज करणे ही ह्या फार्मा कंपन्यांची प्राथमिकता नसून जाहिराती, बाजारीकरण, खरेदी-विक्री, दुसऱ्या कंपनींवर ताबा मिळवणे आहे. नफ्याच्या हव्यासापोटी उपलब्ध सर्व संसाधने ही ॲंटिव्हायरल औषधांवर खर्च न करता मेद कमी करणे, पुंसकत्व वाढवणे, रंग उजळ करणे, उत्साही वाटणे, ट्रॅंक्वीलायझर्स सारख्या जीवनशैलीशी निगडीत औषधांवर खर्च करतात जी केवळ मध्यम आणि उच्च मध्यमस्तरातील श्रीमंतांची गरज आहे. फ्लू ची लस किंवा ॲंटिव्हायरल औषधांवर केले जाणारे संशोधन हे अत्यंत महाग असते आणि त्याची मागणी देखील मर्यादित असते जी नफ्याच्या भुकेल्या औषध कंपन्यांना आकर्षित करीत नाही. साथीच्या आजारांच्या काळात त्यांची मागणी वाढली तरी नंतर मागणी कमी होते. 2003 मध्ये जेव्हा सार्स-फ्लू च्या साथीत औषध आणि लसींवर संशोधन करण्याची मागणी केली गेली तेव्हा संशोधन सुरू राहीले असते तर आज कदाचित लस किंवा औषध उपलब्ध असते परंतु कुठल्याच फार्मा कंपनीने ही जबाबदारी स्विकारली नाही. यामुळेही सध्यपरिस्थितीत होरपळून निघणाऱ्या कामगार वर्गाला येणाऱ्या अनेक दिवसांपर्यंत संक्रमणाची शक्यता कायम असेल.

याचाच परिणाम असणार आहे की ज्या लशीची वाट अत्यंत चिंताक्रांत आतुरतेने लोक बघत आहेत, त्या लशीच्या निर्मितीमध्ये लागलेल्या सर्व कॉर्पोरेट प्रयोगशाळा प्रचंड नफेखोरीची संधी शोधत आहेत. लस निर्माण झाल्यावर त्या अतिशय महागड्या दराने विकल्या जातील, कदाचित लस प्रत्येक वर्षी घ्यावी लागेल आणि लाखो कोटी रुपयांची उलाढाल या धंद्यामध्ये केली जाईल. खुप शक्यता आहे की गरिबांपर्यंत ही लस पोहोचणारही नाही!

थोडक्यात, अराजकतापूर्ण आणि योजनाविहीन भांडवली व्यवस्थेने भांडवली आरोग्य व्यवस्था, भांडवली वितरण व्यवस्था, भांडवली बाजार, भांडवली दळणवळण यांतील अकार्यक्षमता, असमानता आणि फक्त मालकवर्गाप्रतीच असणारा प्रामाणिकपणा जगासमोर आणला आहे. श्रमाच्या अगणित लूटीवर टीकलेली ही नफाकेंद्री भांडवली व्यवस्था कोरोनासारख्या वैश्विक साथीच्या आजाराशी लढायला मुळीच तयार नव्हती किंवा तयार असू शकत नव्हती. साथीच्या आजारा पासून सर्वांना वाचवण्यासाठी आवश्यक पाऊले खर्चिक असतात. भांडवली व्यवस्थेत कोणता भांडवलदार नफ्याशिवाय, सर्वांसाठी, यात आपला पैसा लावेल? कोण विषाणूसंसर्ग चाचणी मोफत उपलब्ध करवून देईल? कोण त्या लाखो स्वास्थ्यकर्मींना वेतन देईल तेही नफ्याशिवाय जे संक्रमण थांबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर चाचणी, रोग्याची ओळख आणि उपचार करतील? संपूर्ण देशपातळीवर कोण निःशुल्क उपचार, विलगीकरणाची व्यवस्था करेल? टाळेबंदी दीर्घकाळासाठी अनिवार्य झाल्यास कोणता मालक कामगारांना सतत पगार देण्यास तयार असेल? भांडवली सत्ता धान्य कोठारांचे दरवाजे जनतेसाठी का उघडेल कारण असे केल्यास धान्याची किंमत खालावेल आणि शेतीच्या क्षेत्रातील भांडवलदार, व्यापारी आणि दलाल उध्वस्त होतील, म्हणून ना व्यापक स्तरावर चाचणी होऊ शकत, ना मोफत इलाज होऊ शकत, ना विलगीकरणाची व्यवस्था, ना कामगार-कष्टकऱ्यांना टाळेबंदीच्या काळात मूलभूत आवश्यक वस्तू आणि सुविधा मिळू शकत!

समाजाला अश्या परिस्थितीतून फक्त आणि फक्त समाजवादी उत्पादन व्यवस्थाच तारू शकते कारण तिच्या केंद्रस्थानी नफा नसून समाज असेल. असे साथीचे आजार समाजवादी व्यवस्थेतदेखील पसरू शकतात परंतु समाजवादी व्यवस्थेत लोकांना मरण्यासाठी सोडून दिले जाणार नाही तर नफ्याऐवजी जनतेला केंद्रस्थानी ठेवून प्राथमिकतेवर आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलली जातील. सर्वांना आपापल्या गरजेनुसार पौष्टिक आहार, राहण्यास निरोगी जागा, औषधे, उपचार, व्यापक प्रमाणावर विषाणू परीक्षण चाचण्या, विलगीकरण इ. गोष्टींची विशेष काळजी घेतली जाईल. हे सहज शक्य होईल कारण उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तू ह्या नफ्यासाठी नव्हे तर समाजाच्या गरजांसाठी असतील.

# कोरोनाच्या काळातही न्यायव्यवस्था भांडवलदारांच्या सेवेत!

## न्यायव्यवस्थेचे कामगार विरोधी चरित्र पुन्हा एकदा समोर!

✍ बबन ठोके

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशपातळीवर लॉकडाउनची घोषणा 24 मार्च रोजी करण्यात आली. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आपल्या कामकाजा संदर्भात एका परिपत्रकाद्वारे काढून स्पष्ट केले की, सर्वोच्च न्यायालयाचे सामान्य काम थांबविण्यात येईल आणि तातडीच्या मुद्यांवरच सुनावण्या घेण्यात येतील. 25 मार्च पासून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तातडीच्या प्रकरणावर न्यायालयाने सुनावण्या करण्यास सुरुवात केली. यानंतरच्या काळातील सर्वोच्च न्यायालयाचा कारभार हा स्पष्टपणे गरिब, कामगार, कष्टकऱ्यांच्या हितांना धाब्यावर बसवणारा तर उच्चभ्रू लोकांचे हित जोपासणारा राहिला आले.

**कामगारांसाठी प्राथमिकता नगण्य!**

पहिले पाहूयात की न्यायपालिकेसाठी 'तातडीच्या' प्रकरणांचा अर्थ काय आहे ते. सर्वसाधारणपणे सर्वोच्च न्यायालयात साधारणतः 3500 पेक्षा जास्त प्रकरणावर महिन्याला सुनावण्या होतात. कोरोना च्या पार्श्वभूमीवर एप्रिल 24 पर्यंत फक्त 593 सुनावण्या झाल्या आहेत. तेव्हा अपेक्षा तर हीच असेल की बहुसंख्यांक जनतेच्या जीवनाला प्रभावित करणाऱ्या, मुलभूत नागरी आणि लोकशाही अधिकारांच्या प्रकरणांवर प्राधान्याने सुनावणी होईल. वास्तव काय आहे?

लॉकडाऊनमुळे अनेक राज्यात अडकून पडलेल्या, हातावर पोट असलेल्या स्थलांतरीत मजूर व वेगवेगळ्या ठिकाणी अडकून पडलेल्या लोकांना घरी परत पाठवण्यासंदर्भात जगदीप छोकर यांच्याद्वारे 7 एप्रिल रोजी दाखल झालेल्या याचिकेला 27 एप्रिल पर्यंत तसेच धूळखात पडून राहावे लागले. लॉकडाऊन संबंधी कोणतेही पूर्वनियोजन सरकारने केलेले नसल्यामुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांची मोठी भयानक अवस्था झाली आहे. शहरात थांबलो तर जगण्याची आशासुद्धा दिसत नसल्याने, सरकारने प्रवासाची सोयच केलेली नसल्यामुळे, मजूर जीवावर उदार होत परतीला निघाले. एकीकडे भुकेचा मार, दुसरीकडे कोरोनाचा धोका अशामध्ये कोट्यवधी कामगार पायी चालत घरी निघाले. काही मजूर तर सायकल किंवा पायी जाताना ठिकठिकाणी अडवले गेले, आणि 25 ते 30 दिवस निवारा केंद्रामध्ये अडकले. बायका-मुलांसह मजुरांच्या सगळ्या कुटुंबाची ससेहोलपट सुरू होती. कोणताही राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग पाहिला तर - डोक्यावर गाठोडे, पाठीवर ओझे, खांद्यावर कडेवर लहान मुलांना आणि वृद्ध आईबापांना घेऊन, गरोदर बायकांसह कामगार गावाकडे निघाले असल्याचे दिसत होते. देशातील हे वास्तव दृष्टीआड करता आले असते का? दोनशे पेक्षा जास्त माणसे, लहान मुले वाटेतच दगावली. काही प्रमाणात अजूनही हे स्थलांतर अशाच पद्धतीने चालूच आहे. औरंगाबादमध्ये रेल्वे खाली चिरडून ठार झालेल्या 16 कामगारांचा जीव आता परत येणार नाही, आणि ना उत्तरप्रदेशात ट्रक अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांचा. महाराष्ट्रातील अनेक खेड्यापाड्यातून विलीनीकरणाच्या नावाखाली बाहेर गावावरून मजुरी करून आलेल्या कामगारांना शेती आणि वाड्या-वस्त्यांवर बांबू ठोकून करावे लागत आहे. अशा कोट्यवधी लोकांना प्रभावित करणाऱ्या या याचिकेला कोर्टाने ताटकळत ठेवले.

8 मे रोजी औरंगाबाद मध्ये रेल्वेमार्गावर चालताना थकून झोपलेले 8 कामगार रेल्वेखाली चिरडले गेले आणि या असंवेदनशील व्यवस्थेने अजून एक हत्याकांड घडवले. रस्त्यावर पोलिस मारतात, सरकार प्रवासाची सोय करत नाही आणि रेल्वेचा मार्ग सरळ गावी जातो म्हणून रेल्वेमार्गावर कामगार चालत होते. रस्त्यांवर चालत असलेल्या कामगारांची नोंदणी करून त्यांना निवारा आणि अन्नाची सोय करावी अशी एक याचिका वकिल अलख श्रीवास्तव यांनी सर्वोच्च न्यायालयात गेली असता, ती कोर्टाने फेटाळून लावली आणि म्हटले की अशाप्रकारे सोय करणे सरकारला शक्य नाही! केंद्र सरकारने कोर्टात म्हटले की "राज्य सरकारे प्रवासाची सोय करत आहेत, पण राग येऊन जर लोकांना चालत जायचे असेल तर कसे थांबवले जाऊ शकते?" अशा स्थितीमध्ये रेल्वेखाली चिरडून जीव गमावलेल्या कामगारांबद्दल कोर्टाने म्हटले की "त्यांना चालत जाण्यापासून कसे थांबवले जाऊ शकते? जर ते रेल्वे रुळांवर झोपत असतील तर त्यांना कोण थांबवू शकते?". कोर्टाने वकिलांनाच सुनावत म्हटले की त्यांची याचिका पूर्णपणे वर्तमानपत्रातल्या बातम्यांवर आधारित आहे! ज्या कोर्टाला एवढेही समजून घेता येत नाही की जर खरोखर प्रवासाची सोय सरकारने केली असती, तर लोक चालत निघालेच नसते, त्या कोर्टाला काय म्हणावे! हे विसरू नका की याच कोर्टाने फक्त एका पत्राच्या आधारावर सी.ए.ए.-एन.आर.सी. विरोधी आंदोलनात लहान मुलांच्या सहभागा विरोधातली याचिका फेब्रुवारीत स्वत:च दाखल करून घेतली होती!

दुसरीकडे रिपब्लिक टीव्ही चे संपादक अर्णब गोस्वामी यांनी जातीयवादी वक्तव्य त्यांच्या टीव्ही चॅनेलवरून केले. त्यासंबंधी देशात अनेक ठिकाणी यांच्यावर तक्रारी दाखल करण्यात आल्या. या सर्व तक्रारी मधून संरक्षण मिळण्यासाठी रात्री आठ नंतर दाखल केलेली त्यांची याचिका दुसऱ्या दिवशी साडे दहा वाजता कोर्टाने प्राधान्याने पुढे घेतली. व्यक्तीस्वातंत्र्याचाच दाखला जर द्यायचा आहे तर सर्वोच्च न्यायालयामध्ये अनेक महिने काश्मिर मध्ये स्थानबद्ध केलेल्यांच्या याचिका अनेक महिने पडून आहेत, त्यांचे काय? अर्णब गोस्वामी हा मुळातच भांडवलदार वर्ग, भाजप आणि संघाचा चाटूकार पत्रकार म्हणून सर्वांना परिचित आहे. पत्रकारितेच्या नावाखाली जोरजोराने ओरडणे, खोट्या बातम्या देणे, ढोंगी राष्ट्रवादाच्या नावाने धार्मिक-जातीय तणाव वाढवणाऱ्या आणि फॅसिस्टांच्या समर्थनाच्या बातम्या देणे, हाच रिपब्लिक टीव्ही आणि अर्णब गोस्वामी यांचा अजेंडा आहे. कोट्यवधी कामगारांच्या जीवनाची याचिका ताटकळत ठेवली आणि अर्णब गोस्वामीला तात्काळ सुनावणी! प्राधान्य स्पष्ट आहे.

कोर्टाला कामगारांच्या प्रश्नाचे किती गांभीर्य आहे, याचे अजून एक उदाहरण घेऊयात. 'स्वॅन' अर्थात स्ट्रॅण्डेड वर्कर्स ॲक्शन नेटवर्क (अडकून पडलेल्या कामगारांच्या मदतीसाठी कृती करणारी एक यंत्रणा) या संस्थेने साधारणतः दहा हजार कामगारांशी संवाद साधल्यानंतर 15 एप्रिल रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यात असे निदर्शनात आले की, 89 टक्के कामगारांना त्यांच्या मालकांनी पगार दिलेले नाहीत, तर 96 टक्के कामगारांना सरकारकडून अन्नधान्य प्राप्त झालेले नाही. यात अजून एक भर अशी की, कामगार मंत्रालयाने राज्यांच्या मुख्य सचिवांना असे निर्देश दिले की, 'रोजगार हमी योजनेअंतर्गत सर्व इच्छुक आणि नोंदणीकृत कामगारांना नियमित वेतन दिले जावे'. या योजनेअंतर्गत वर्षभरात साधारणत: शंभर दिवस सर्व मजुरांना काम आणि वेतन देणे अनिवार्य होते. मनरेगा अंतर्गत देशभरामध्ये 12 कोटी मजुरांची नोंद आहे. प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी की या दरम्यान काम फक्त 1.5 कोटी लोकांनाच मिळाले. बाकी लोकांना वेतन देण्यात यावे यासंदर्भात याचिका सर्वोच्च न्यायालयाच्या दरबारी आल्या होत्या परंतु न्यायालयाने या याचिकांना फार गांभीर्याने न घेता लटकत सोडून दिले. खरेतर मनरेगा अंतर्गत अगदी राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात देखील लोकांना काम देणे अपेक्षित असते तरी देखील न्यायालय या संबंधी येवढे उदासीन का? सध्या शेतीकामे बंद आहेत, उद्योग व इतर सर्व कामे बंद झाल्यामुळे कामगारांवर दुहेरी संकट ओढवले आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने याची दखल न घेता लॉकडाउन उठल्यानंतर दोन आठवड्यांनी सुनावणीसाठी तारीख दिल.

अशाच परिस्थितीत प्रवासी मजूरांबाबत ओरिसा उच्च न्यायालयाने काय निकाल द्यावा? कोर्टाने म्हटले की प्रत्येक परत येणाऱ्या कामगाराची कोरोना चाचणी नकारात्मक आली पाहिजे, तरच त्यांना येऊ द्यावे! चाचणी केलीच पाहिजे असा निकाल मात्र कोर्टाने दिला नाही. चाचण्या तर कोणतेच सरकार करत नाहीये! थोडक्यात लाखो कामगारांचा घरी जाण्याचा रस्ता बंद! इतकेच नाही औरंगाबाद उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की ज्या भागात निर्बंध उठवले गेले आहेत, तेथे कामावर परत न येणाऱ्या कामगारांचे पगार मालक कापू शकतात. कोट्यवधी कामगार आपापल्या गावांकडे परत जात असताना, आणि शहरामध्ये जगण्याची शाश्वती मिळत नसताना, कामगारांना घरून शहरांमध्ये आणण्याची सोय नसताना, न्यायालयाने दिलेला हा निर्णय फक्त मालकांच्या हिताचे रक्षण करणारा आहे.

**कोरोनाच्या साथीतही मानवाधिकार धाब्यावर!**

एकीकडे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न केले जात आहेत आणि म्हणूनच जगभरामध्ये अनेक देशात कैद्यांना हंगामी जामिनावर (पॅरोल) बाहेर सोडले जात आहे. भारतातही हे केले जात आहे, परंतु सरकारला नकोशा असलेल्या मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या बाबतीत, जनतेच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत मात्र न्यायपालिका ठीक सरकार धार्जिणी भुमिका घेत आहे. हे आपल्याला डॉ.आनंद तेलतुंबडे आणि गौतम नवलखा या दोन मानवी हक्क कार्यकर्त्यांच्या अटकेमध्ये पाहायला मिळते. या दोन कार्यकर्त्यांनी 14 एप्रिल रोजी आत्मसमर्पण केले आणि त्यांना अटक करण्यात आली. याच प्रकरणात इतर 5 विचारवंत कार्यकर्ते अगोदरच तुरुंगात आहेत. खरं तर भीमा कोरेगाव प्रकरणी खोटे आरोप लावून तत्कालीन भाजप सरकारने यांना अटकेत टाकण्याचा डाव रचल्याचे महाराष्ट्रातील नवीन सरकारने जाहीर केले होते, आणि खटले मागे घेणार होते, तेवढ्यात मोदी-शाह सरकारने केसच महाराष्ट्राकडून काढून घेतली! तेव्हा डॉ. आनंद तेलतुंबडे आणि गौतम नवलखा यांची अटक ही राजकीय विचाराच्या भिन्नतेमुळे झाल्याचे जाहीर आहे. हे दोन्ही कार्यकर्ते हिंदुत्ववादी विचारांचे कडवे टीकाकार असल्याचे सर्वपरिचित आहेच. न्यायालयात यासंबंधी युक्तीवाद करत असताना वकिलांनी या दोन्ही कार्यकर्त्यांची बाजू मांडत असे सांगितले की, या दोन्ही कार्यकर्त्यांचे वय हे साठ पेक्षा जास्त आहे. त्यांना अनेक प्रकारच्या व्याधी देखील आहेत आणि कोरोना विषाणू च्या पार्श्वभूमीवर ही अटक थांबवण्यात यावी. परंतु न्यायालयाने या संबंधी कोणताही विचार न करता या दोघांची तात्काळ अटक करण्यात यावी असे आदेश देण्यात आले. एकीकडे लॉकडाउनच्या काळात कुख्यात आरोपी हंगामी जामिनावर (पॅरोल) तुरुंगातून बाहेर सोडले जात आहेत तर दुसरीकडे आजीवन मानवी हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या दोन कार्यकर्त्यांची याचिका फेटाळून न्यायालयाने यांना सरळ तुरुंगाचा मार्ग दाखवला आहे.

एकीकडे सर्वोच्च न्यायालयाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जेल रिकामे करण्याचा आदेश दिला आहे. दुसरीकडे दिल्ली दंगलीच्या पार्श्वभूमीवर एन.आर.सी.-सी.ए.ए. विरोधी आंदोलनातील अनेक सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांसह विद्यार्थ्यांचे देखील अटकसत्र दिल्ली पोलिसांनी कोरोनाच्या साथीमध्ये सुरू आहे. अगदी दोन महिन्याची गरोदर असलेली जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठाची पी.एच.डी. (PhD) करणारी विद्यार्थिनी सफुरा जरजर या विद्यार्थिनीला देखील अटक करण्यात आली आहे. यासंदर्भातील याचिकेवर निकाल देताना दिल्ली उच्च न्यायालयाने एवढेच म्हटले की सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच अटक व इतर कारवाई केली जावी आणि जून महिन्यातील तारीख दिली आहे. कायदा धाब्यावर बसवून केलेल्या चौकशांबाबत न्यायालयाला प्राधान्य नाही हे दिसून येते.

**कोरोनाच्या चाचणीसाठी सुद्धा खाजगी धंद्याच्या बाजूने निकाल**

सुरुवातीलाच सरकारने कोरोनाच्या खाजगी चाचण्यांना रु. 5000 फी घेऊन करण्याची परवानगी दिली. स्पष्ट आहे की प्रचंड नफेखोरीची ही संधी खाजगी प्रयोगशाळांना देण्यात आली. देशाचे आजचे वास्तव हे आहे की सरकार पुरेशा चाचण्या करत नाहीये, प्रत्येक सरकारी केंद्र गर्दीने ओसंडून वाहत आहे आणि चाचणी करण्यास गेलेल्या लोकांच्या मनात गर्दीमुळेच भिती निर्माण होत आहे. यासंदर्भात 8 एप्रिल रोजी वकील शशांक देव सुधी यांच्या याचिकेवर निर्णय देताना सर्व देशामध्ये कोरोनाची चाचणी मोफत केली जावी असा आदेश दिला. यानंतर लगेचच सरकारने तातडीने हा निर्णय रद्द करण्याची सरकारने विनंती केली. सरकारने म्हटले की असे केल्यास खाजगी प्रयोगशाळा व्यवसाय बंद करतील! लागलीच सर्वोच्च न्यायालयाने फक्त 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी' मोफत चाचणीची सोय करावी असा सुधारलेला निर्णय दिला. आर्थिक दुर्बल मध्ये बहुसंख्य जनता येतच नाही! त्यामुळे बहुसंख्यांची चाचणी होणारच नाही! प्रश्न तर नक्की विचारला गेला पाहिजे की असे कोणते सरकार असते जे कोर्टाकडे कोरोनाची चाचणी मोफत होऊ नये अशी मागणी करते? भांडवलदारांचे सरकार!

यानंतरही अमित द्विवेदी यांनी 21 एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती की "सरकारने सर्व आरोग्य सेवेचे राष्ट्रीयीकरण करावे" आणि "कोरोनाच्या सर्व चाचण्या मोफत केल्या जाव्यात". त्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्णय देत असे सांगितले की, "आम्ही हा निर्णय देऊ शकत नाही, कारण ही मागणीच मुळातच चुकीची आहे. अगोदरच सरकारने काही रुग्णालय आपल्या ताब्यात घेतली आहेत." प्रश्न नक्कीच विचारला गेला पाहिजे की जर स्पेन सारखा देश कोरोनामुळे आपल्या आरोग्य व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करतो तर भारत का नाही? खाजगी रुग्णालयांना आणि प्रयोगशाळांना न्यायालय सल्ला देत आहे की, "महामारीच्या काळात व्यवसायाला थोडी झळ सहन करून रुग्णालय आणि प्रयोगशाळा मालकांनी थोडे उदार वर्तन करावे." कोर्ट खाजगी धंदेबाज दवाखान्यांना विनंती करते, यातून समजून घ्यावे की या देशावर खरे राज्य कोणाचे आहे. लक्षात घ्या, जे सरकार नोटबंदी करू शकते आणि जमिनी सक्तीने ताब्यात घेऊ शकते, ते दवाखाने आणि प्रयोगशाळाही ताब्यात घेऊ शकते! पण सरकारला, आणि कोर्टालाही कोणाचे हित महत्वाचे आहे ते दिसून आले आहे!

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित